# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**


**गणपत्रिका क्रमांक : ३९**

MAHMAR 19358/13/1/2000 - TC

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पाचवे / अंक ३ / सप्टेंबर २०००



## संपादकीय

### शांतता सहस्त्र परिषद

जगातील सर्व राष्ट्रे आज सर्वनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहेत. अणुबॉम्ब, क्षेपणास्त्र, मानवी बॉम्ब, टोळीयुद्ध, घुसखोरी, मादक पदार्थांचा व्यापार इ.चा धोका सर्वांना भेडसावत आहे. अशा परिस्थितीत हे थांबावे यासाठी २९ ऑगस्ट रोजी न्यूयॉर्क मध्ये संयुक्त राष्ट्रातर्फे (यू.नो.) भरलेल्या धार्मिक आणि आध्यात्मिक नेत्यांच्या जागतिक शांतता सहस्त्रक परिषदेचे सभागृह विविध धार्मिक आणि आध्यात्मिक नेत्यांच्या प्रार्थनेने गजबजले मानवी जीवन मूल्यांचे उपासक श्री. श्रीरवि शंकर, ध्यानधारणा व योगाचे शिक्षक आहेत. त्यांना या परिषदेला उपस्थित असलेल्या सभासदांना स्वत:च्या धर्मा इतकेच इतरांच्या धर्मा बद्दल सहिष्णु भावना जपण्याच्या कृतीवर जोर दिला. इतर दोन सभासद ज्यांना श्रोत्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तो म्हणजे साधु दादा जे.पी. वासवानी, ज्यांनी आपल्या भाषणात बरीच मार्मिक उदाहरणे व वचने उदधृत केली; व दुसरे म्हणजे न्यूयॉर्कमधील रिव्हर साइड चर्चचे ज्येष्ठ पेस्टर रेव्हरंड जेमस् फोर्बस ज्यांनी धर्माधर्मामध्ये चर्चा व्हावी अशी इच्छा प्रगट केली. त्यांनी उच्चारलेल्या 'आमिन' ला सर्व उपस्थितांनी दाद दिली व त्यामुळे परिषदेचे सेक्रेटरी बावा जैन यांनी सांगितले की हे संयुक्त राष्ट्राचे सभागृह कधीच यापूर्वी असे गुंजले नाही.

जेव्हा रिकूट रिंपोचे व इतर तीन तिबेटीयन बुद्धभिक्षूक मंचावर आले तेव्हा त्यांचे गुरु दलाई लामा यांची अनुपस्थिती जाणवली. इतर नामांकित ज्यांचा या प्रार्थनेत सहभाग होता ते म्हणजे इस्त्रायलचे मीअर लाऊ, व्हॅटीकनचे फ्रान्सीस कार्डीनल अरीझे, सिरीयाचे शेख अहमद कुफ्टारो, माता अमृतानंदमयी देवी, जैनांचे आचार्य चंदनजी, चीनचे मीन झीटींग, जथ्थेदार मनजितसिंग, अजमेरच्या दिवान दर्गाचे सय्यद झीनुल अॅबेडीन, स्वामी चिदानंद सरस्वती, रे जोसेफ मार इरॉनिअस आणि रे. जोन कैवेल व एकूण हजार प्रतिनिधी सहभागी झाले.

या विश्वशांतीसाठी जमलेल्या धार्मिक व आध्यात्मिक नेत्यांना लेखी ठरावा व्यतिरीक्त खालील बाबींसाठी ही नेतृत्व करावे लागेल, असे विचार एका वृत्तपत्राने मांडले आहेत.

१) संघर्षाची ठिणगी कुठे पडू शकेल याबद्दल अचूक ज्ञान, त्या दृष्टीने स्थानिक, राष्ट्रीय आणि प्रांतीय अधिकारी यांना जागृत करणे व संघर्ष न होण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

२) संघर्ष घडल्यास तो शांत करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाचे अधिकारी, प्रांतीय, धार्मिक-आध्यात्मिक नेते व संघर्षाला कारण असलेल्या संघटना यांच्याशी सल्लामसलत करून काम करणे.

३) संघर्ष झाल्यावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी सल्ला देणे व कायम शांतता टिकून रहाण्यासाठी उपाय सुचविणे.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशीच्या चर्चासत्रात भाग घेतलेल्या पाच महिला सभासदांनी या चर्चासत्राचा ताबा घेतला त्यात शांततेच्या नोबेल पुरस्काराने गौरविलेल्या बेटी विल्यम यांनी सांगितले की युद्धात भाग घेणे हे बहुतांश पुरुषांचे काम आहे. तर महिला शांतता स्थापन करतात. त्यांनी पुढे जोर देऊन सांगितले की अहिंसा पाळणे हे भ्याडाचे काम नाही त्याला धैर्य लागते. बेटी विल्यम् बरोबरच या सत्रातील इतर महिला होत्या, सत्राच्या अध्यक्षा व टाइम्स या वृत्तपत्राच्या अध्यक्षा सौ. इंदुमती जैन , महात्मा गांधींची नात इला गांधी, प्रसिद्ध पामाटॉलॉजिस गुडॉल आणि आफ्रीकन वर्थी मॅकेंझी.

सहस्रक शांतता परिषदेचे अध्यक्षपद मिळविण्याचा हा सन्मान भारतीय वृत्तसमूहाच्या अध्यक्ष असणाऱ्या महिलेस मिळण्याची घटना पहिलीच असावी. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भगवान महावीरांना त्यांनी ध्यानानंतर डोळे उघडल्यावर जेव्हा त्यांच्याजवळ बसलेला पक्षी उडाला तेव्हा डोळा उघडल्यावर निर्माण होणाऱ्या हिंसेची जाणीव झाली. हिंसा वगळणे, नाकारणे, टाळणे म्हणजे केवळ अहिंसा नव्हे तर अहिंसा म्हणजे भयच नाकारणे, भयाची उणीव ! मानवतेवरील प्रेमाचे चिरंतन आस्तित्व म्हणजे अहिंसा ! अहिंसेसाठी चळवळ सुरु करायची असल तर अज्ञान दूर करणे गरजेचे आहे. स्वतःला खरे जाणता येणे हे खरे ज्ञान. अहिंसेचा विचार जाती, वंश, धर्म, गट लिंगभेद दूर करीत आहे. आजच्या युवा पिढीमध्येच प्रेमाची भाषा, भावना समजून घेण्याची ताकद आहे असा त्यांना विश्वास आहे. आजचा तरुण वर्ग हा विश्वाचा नागरिक असून त्याला प्रेमाची वैश्विकभाषा समजते, असे त्या म्हणाल्या.

आतापर्यंत यूनोने जे काम केले ते म्हणजे दोन देशामधील युद्धामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे वा युद्ध टाळण्याचे. पण युद्ध पिपासू राष्ट्रांकडून वा दुसऱ्या राष्ट्राचा भाग बळकाविण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रामध्ये सलोखा वा संभाषण घडवून आणण्याच्या प्रयत्नांत त्यांना अपयशच आले. व आता तर सबंध मानव जातच नष्ट होण्याची वेळ येऊन ठेपल्यावर, मग ती नैसर्गिक आपत्तीमुळे असो, भयानक रोगराईमुळे असो, पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे असो, मादक द्रव्यांच्या प्रसारामुळे असो, दहशतवादामुळे असो, संबंध मानवजातीला शाश्वत मूल्ये जपण्याची शिकवण देण्याची वेळ आली आहे. या परिषदेने हा प्रयत्न केला आहे पण फारच थोडा आहे. व याला फार उशीरही झाला आहे.

जगात माणसामाणसांमध्ये व राष्ट्राराष्ट्रात सदैव शांततेची अपेक्षा करणाऱ्या लोकांसाठी न्यूयॉर्कमध्ये भरलेल्या परिषदेत प्रेम, सहनशीलता, क्षमाशिलता, समजुतदारपणा, न्याय या जीवनमूल्यांचा वाढीसाठी प्रयत्न केले पाहिजेत हे एकमुखाने मान्य केले. जगातील प्रत्येक जाती, धर्माच्या नेत्यांनी माणसाच्या जीवनातील भय नष्ट केले पाहिजे. त्याची सहनशीलता वाढवली पाहिजे. मुस्लीम मौल्लवी, हिंदू पुजारी, जैन मुनी, ख्रिश्चन धर्मगुरु, बुद्ध भिक्षु जे आतून वेगळ्याच निष्ठाबद्दल बोलत होते. परंतु सर्वधर्मसमभाव, सर्व प्रकारच्या हिंसेचा निषेध, स्त्री-पुरुषसमानता, गरिबी दूर करणे, आणि पर्यावरणाचा

(पान क्र. १७ वर)




वर्ष पाचवे / अंक ३ / सप्टेंबर २०००

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर
**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल बुटाला
**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | |
| २) | २० μ च्या निमित्ताने | श्री. वासुदेव देशपांडे | ३ |
| ३) | शिक्षणक्षेत्राचं खरं दुखणं | श्री. प्रकाश बाळ | ६ |
| ४) | यत्नांचा वन्ही प्रज्वलित करा | सौ. उषा कळमकर | ८ |
| ५) | मराठी संतांचा गणेश | शैला जोगळेकर | १० |
| ६) | मेहतर समाजाची व्यथा | श्री. जगदीश खैरालिया | १२ |
| ७) | वार्धक्य | सौ. वंदना प्रसादे | १६ |
| ८) | तबल्याची लयकारी आणि सुरांची अदाकारी सहज साधणारा कलाकार - चंद्रशेखर वझे | सौ. मंजिरी दांडेकर | १८ |
| ९) | मुलाखतकारांची मुलाखत-एक रंगलेला 'शब्द' सोहळा | सौ. सुचेता मयेकर | २१ |
| १०) | फिजीतील भारतीय वंशिकांवरील संकट | | २५ |
| ११) | अग्रक्रम | श्री. अशोक करंदीकर | २८ |
| १२) | पर्यावरणासाठी आपण काय करू शकतो | प्रा. मोहन पाठक | ३१ |
| १२) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३२ |
| १३) | दिशा वर्ष ४थे लेख सूची | प्रा. मोहन पाठक | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्या प्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# २० μ च्या निमित्ताने .....

**श्री. वासुदेव देशपांडे**

*प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरण्यावर बंदी आली. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने झालेला हा महत्त्वपूर्ण निर्णय. या क्षेत्रात काही काळ काम केलेले आमचे माजी विद्यार्थी श्री. वासुदेव देशपांडे यांनी या निमित्ताने दिलेली माहिती या लेखात वाचावयास मिळेल. - संपादक*

१९१२ साली बुडालेल्या टायटॅनिक या बोटीचे उत्खनन ज्यावेळी झाले, त्यावेळी सगळ्यांना तीव्रतेने जाणवलेली गोष्ट होती, प्लॅस्टिकचा अभाव. टायटॅनिकवरील एकही वस्तू प्लॅस्टिकने बनलेली नव्हती किंवा प्लॅस्टिकमध्ये पॅक झालेली नव्हती. कारण त्यावेळी प्लॅस्टिकचा शोध लागलेलाच नव्हता. नायलॉन व प्लॅस्टिक १९३० च्या दशकात शोधले गेले व नंतर अनेक प्रकारच्या व रंगाच्या प्लॅस्टिकने जग पादाक्रांत केले.

आपण हरघडी प्लॅस्टिकपासून बनलेल्या वस्तू वापरतो. प्लॅस्टिकने आपले आयुष्य पूर्ण व्यापून टाकलेले आहे. 'प्लॅस्टिक शिवाय जग' अशी कल्पनाही आपण करु शकत नाही, इतके आपण प्लॅस्टिकच्या आहारी गेलेलो आहोत. प्लॅस्टिक आपल्या घरात घुसून, कपड्यांच्या स्वरुपात आपल्या शरीरांवरही विराजमान झाले आहे. आपल्या हरघडीच्या गरजेच्या वस्तू जसे दूध, मसाले, औषधे, नमकीन पदार्थ, गोठवलेले पदार्थ, फास्ट फूडस्, प्री कुक्ड अन्नपदार्थ, साबण, मीठ, चहा कॉफी, ड्रिंक, खाद्य व अखाद्य तेले, निरनिराळी बंगणे, बिस्कीटे, गोळ्या, चॉकलेटस्, गुटखा, पान मसाले, तंबाखूच्या पुड्या यासारख्या अनंत वस्तू प्लॅस्टिकमध्ये पॅक केलेल्या असतात. आणि या शिवायही बॉलपेन, शाईपेन, निरनिराळ्या प्रकारच्या बाटल्या, बरण्या, मोठे डबे, छोट्या डब्या, चपला बूट, खिडक्यांचे पडदे, बादल्या, सामानसुमान वाहून नेण्याच्या बॅग्या, निरनिराळ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू अगदी आपले कपडे सुद्धा प्लॅस्टिकने बनवलेले असतात. केवळ आपल्या दैनंदिन जीवनातच नव्हे तर प्लॅस्टिक हे अनेक रासायनिक कारखान्यांमध्ये, वाहनांमध्ये, प्रयोगशाळांमध्ये, शस्त्रास्त्रांमध्ये, शेतकी संबंधी उपकरणांमध्ये, खते, बीबियाणे व रसायने पॅक करण्यासाठी सुद्धा फार मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.

प्लॅस्टिकचे काही साधारण प्रकार असे आहेत :-

1) LDPE (Low Density Polythelene)
2) HDPE (High Density Polythelene)
3) LLDPE (Linear Low Density Polythelene)
4) HMHDPE (High Molecular High Density Polythelene)
5) Polyester
6) Metalised Polyster
7) PVC (Poly Vinyle Chlordide)
8) PVCD (Poly Vinylidence Chloride)
9) Nylon
10) Poly propelene
11) BOPP (Bixilly Oriented Poly Propelena)
12) Metalised BOPP
13) Pearlised BOPP
14) CPP (Cast Polypropelene)

प्लॅस्टिकच्या ज्या पातळ पिशव्यांवर आता बंदी घातलेली आहे त्या LDPE या पदार्थापासून मुख्यतः बनलेल्या असतात.

प्लॅस्टिकच्या पातळ पिशव्यांची जाडी मायक्रॉन या एककात मोजतात. मायक्रॉनचे ' μ 'चिन्ह असे आहे.

१ μ = १/१००० मि.मी.

प्लॅस्टिक हे पॅकेजिंग मटेरिअल म्हणून अतिशय उत्कृष्ट आहे. पॅकेजिंगसाठी साधारणत: खालील मटेरियल्स वापरतात.

१) काच (बरण्या वगैरे)

२) निरनिराळे धातू

३) वेताच्या पिशव्या

४) कापडी माध्यमे (पिशव्या, गोण्या इ.)

५) कागदी माध्यमे (पुठ्ठ्यांची खोकी, कागदी पिशव्या इ.)

६) आणि प्लॅस्टिक (कठीण, लवचिक)

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पॅकींजिंग या संस्थेने १९८८ साली प्रकाशित केलेल्या पुस्तकात ही माध्यमे व प्लॅस्टिक यांच्यात तुलना केली आहे.

**तक्ता :**

| प्रॉडक्ट | पॅकींग मटेरियल | पॅकींगची प्रॉडक्टच्या तुलनेत किंमत (%) |
|---|---|---|
| १) औषधे (गोळ्या) | ॲल्युनियम/ पॉलीथिन | ५ |
| २) मसाले | लवचिक प्लॅस्टिक फिल्म्स | ८ |
| | धातूचे पॅकींग | ३२ |
| ३) खाद्य तेले | लवचिक प्लॅस्टिक | ३ |
| | प्लॅस्टिकचे कठीण डबे | ९ |
| | धातूचे डबे | १५ |
| ४) साबण-प्रिमियम पॉप्युलर | प्लॅस्टिक फिल्म्स व कागद | १२ |
| | कागद व पुठ्ठ्यांची खोकी | ९ |
| ५) सुगंधी अत्तरे | काच | ११० |
| ६) निरनिराळी जॅम्स | काच | १२ |
| ७) सॉस | काच | ११ |
| ८) मद्यपेये व इतर शीतपेये | काच | १० |

वरील तक्ता पॅकेजिंग मटेरियलची किंमत मूळ पदार्थांच्या तुलनेत दर्शवितो. उदा. सुगंधी अत्तराच्या बाबतीत- जर अत्तरांची किंमत रु. १००/- असेल तर त्याच्या पॅकेजिंगची किंमत रु. ११०/- असते. या वरील तक्त्यावरून आपल्या लक्षात येईल की प्लॅस्टिक पॅकिंग किती स्वस्त आहे.

डॉ. एन्. प्रकाशन, असिस्टंट डिरेक्टर (R & D) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पॅकेजिंग, यांच्या निरीक्षणाप्रमाणे:-

१) प्लॅस्टिकचे गुणधर्म हे गरजेप्रमाणे बदलता येतात. काच, कागद, धातू किंवा वेत यांसारख्या पदार्थांचे गुणधर्म एका मर्यादेत आपल्याला हवे तसे बदलून घेता येतात. पण प्लॅस्टिकमध्ये अमर्याद बदल करता येतो.

२) दुसरे म्हणजे प्लॅस्टिक रिसायकल करण्यासाठी अत्यंत कमी ऊर्जेची गरज भासते. इतर पदार्थांच्या तुलनेत प्लॅस्टिकसाठी फक्त २० ते २५ % ऊर्जासुद्धा रिसायक्लिंग साठी पुरेशी ठरु शकते.

३) तिसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की प्लॅस्टिकमध्ये प्रत्येक पॉलीमरचे स्वत:चे असे गुणधर्म असतात. एकाहून अधिक पॉलिमर्स एकत्र जोडून आपण आपल्याला हव्या त्या गुणधर्मांचे प्लॅस्टिक सहज प्राप्त करु शकतो.

[ Original - In plastics as each polymer has certain characteristics, more than one polymer can be combined to achieve a material of required properties at competitive cost]

४) चौथी गोष्ट अशी की प्लॅस्टिक बनवण्यासाठी सुद्धा इतर मटेरियल्स पेक्षा कमी खर्च येतो. भविष्यात प्लॅस्टिकची गरज वाढत जाणार असल्यामुळे प्लॅस्टिक हेच सगळ्यात स्वस्त मटेरियल असणार आहे.

५) प्लॅस्टिक हे वजनाला हलके असून सुद्धा त्याची रेझिस्टंट कॅपेसिटी जवळजवळ इतर पदार्थांइतकी असते. उदा. काचेच्या बरण्यांपेक्षा प्लॅस्टिकच्या बरण्या हाताळणे सोपे जाते कारण त्यांचा रेझिस्टन्स काचेपेक्षा जास्त असतो.

६) प्लॅस्टिकचा आणखी एक विशेष गुणधर्म असा आहे की सामान्य तपमानाला प्लॅस्टिकची कशाशीही अभिक्रिया होत नाही. त्यामुळे अनेक रसायनांसाठी व खाद्यपदार्थांसाठी प्लॅस्टिक हे सर्वोत्कृष्ट माध्यम आहे. रसायने मूळ स्वरुपात टिकवून ठेवण्यासाठी व खाद्यपदार्थांच्या ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी प्लॅस्टिक हे अतिशय उपयोगी माध्यम आहे.
७) प्लॅस्टिक हे अतिशय टिकाऊ माध्यम आहे. प्लॅस्टिकची पर्यावरणाशी अभिक्रिया होत नाही. त्यामुळे प्लॅस्टिक आहे त्या स्थितीत हजारो वर्षे पडून राहते. आणि हेच त्याचे व्यंग ही आहे.

कारण बायोडिग्रेबेल नसल्यामुळे प्लॅस्टिक आहे त्याच स्थितीत तेथेच पडून रहाणार आहे. गेल्या काही वर्षात मुंबईत व इतरत्रही प्लॅस्टिकने जे तांडव घातले आहे. त्यामुळे प्लॅस्टिकचा हा तोटा पुरेसा जाणवतो.

जमिनीत सतत पडून राहिलेल्या या पिशव्या जमिनीचा कस हळू हळू घालवू शकतात. गटारे, नाले यांमधे पडलेल्या पिशव्या हे नाले व गटारे तुंबवतात, मग त्यातूनच वाहतूक व्यवस्था, रेल्वे कोलमडणे, घराघरामध्ये पाणी शिरणे वगैरे सारखे प्रकार सुरु होतात. मग त्यातूनच पुढे लेप्टोस्पायरोसिस सारखे रोग जोर धरतात.

मध्यंतरी मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश या राज्यांमध्ये जनावरांच्या पोटातून न पचलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या काढल्या गेल्या. काही काही केसेस मध्ये तर मरणासन्न जनावरांच्या आतड्यांतून ४०-४० किलो पर्यंत पिशव्या काढल्या गेल्या. या पिशव्या समुद्रात वाहत जाऊन समुद्री प्राण्यांचा मृत्यू ओढवल्याची अनेक उदाहरणे आहेत. वर या पिशव्या समुद्रकिनाऱ्यावर वहात येऊन समुद्रकिनारे विद्रूप करत आहेत.

विचार करा...... आज जर ही परिस्थिती आहे तर आणखी काही वर्षांनी काय झाली असती ?

त्यामुळे सरकारने २०μ पेक्षा पातळ पिशव्यांवर बंदी घातलेली आहे. प्लॅस्टिकचा कचरा गोळा करणाऱ्या बायका २०μ पेक्षा पातळ पिशव्या उचलू शकत नसल्याचे आढळून आले. म्हणूनच २० मायक्रॉन पेक्षा पातळ पिशव्या बनवूच नये असे सरकारने ठरवले.

पण ही २०μची मर्यादा अपुरी आहे. कारण गुटखा, पान मसाले, तंबाखूच्या पुड्या यांची जाडी ५०μपर्यंत असते. आणि या छोट्या आकाराच्या पिशव्या रस्त्यावरच इतस्ततः पसरलेल्या असतात. पर्यावरणाच्या दृष्टीने याही पिशव्या तितक्याच हानिकारक आहेत. त्यामुळे २०μ ची मर्यादा सरकारने वाढवून ५० μ करावी.

या शिवाय पिशव्यांच्या आकारावरही निर्बंध घालणे आवश्यक आहे. कारण फार छोट्या आकाराच्या पिशव्या व पुड्या उचलता येत नाहीत. म्हणून २ इंच x २ इंच आकारापेक्षा.कमी क्षेत्रफळाच्या पिशव्या व पुड्या बनवूच नयेत असाही आदेश काढणे आवश्यक आहे.

आपल्या पुराणात भस्मासुराची गोष्ट आहे. भस्मासुर माजला तेव्हा त्याला वठणीवर आणण्यासाठी देवांना नाना प्रयत्न करावे लागले. प्लॅस्टिकचा हा भस्मासूर आता हळू हळू माजत चालला आहे. पण आपणही त्याला वेळीच आवर घालतो आहोत ही एक चांगली गोष्ट आहे.

संदर्भ : टाईम्स ऑफ इंडिया, प्लॅस्टिक्स इन पॅकेजिंग (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पॅकेजिंग ने १९८८ चे प्रकाशन)

**श्री. वासुदेव देशपांडे**
भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे.

•••

# शिक्षणक्षेत्राचं खरं दुखणं

**श्री. प्रकाश बाळ**

*शिक्षणाच्या क्षेत्रात असंख्य समस्या आहेत. लोकसंख्यावाढी बरोबर शिकणारे वाढले. पदवीधर होण्याचं ध्येय आणि नोकरीचं मृगजळ यामागे लागले. शिक्षण क्षेत्रांच हे दुखणचं आहे ! या दृष्टीने प्रसिद्ध पत्रकार श्री. प्रकाश बाळ यांचा हा लेख - संपादक*

परीक्षांतील गैरव्यवहार थांबविण्यासाठी उत्तरपत्रिकांच्या फेरमूल्यांकनाची पद्धत रद्द करण्याचा नियोजित निर्णय म्हणजे ' आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी' असा एकूण प्रकार आहे. असा निर्णय घेणं म्हणजे पुन्हा एकदा शिक्षणक्षेत्राच्या खऱ्या दुखण्याकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे.

शिक्षणक्षेत्रांच खरं दुखणं आहे, ते विद्यार्थ्यांच्या प्रचंड संख्येचं आणि प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरीसाठी पदवीपर्यंत जाऊन पोचणं अनिवार्य झाल्याचं.

वस्तुत: पदवी आणि त्यापलीकडचं शिक्षण हे मर्यादितच राहिलं, तर शिक्षण व्यवस्थेवरचा ताण झपाट्यानं कमी होईल. एकदा हा ताण कमी झाला की, शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या उपाय योजना परिणामकारक ठरू शकतील याच उद्देशाने ११ + ४ हा शिक्षणक्रम बदलून १०+२+३ ही पद्धत अमलात आणण्यात आली. दहावीनंतर +२ या टप्प्यावर विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण दिले जाईल आणि त्यामुळे नोकरीसाठी पदवीपर्यंत शिक्षण घेण्याची गरजच भासणार नाही, हा असा बदल करण्यामागचा उद्देश होता. हे व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या जातील आणि त्यात विविध कला (Trade's) चे प्रशिक्षण दिले जाईल, अशी ही नव्या अभ्यासक्रमामागची मांडणी होती.

प्रत्यक्षात व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या अशा केंद्राऐवजी + २ च्या टप्प्यावर कनिष्ठ महाविद्यालयांचेच पीक आले. पूर्वी अकरावीनंतर अभियांत्रिकी / वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेश न मिळालेले विद्यार्थी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पुरा करीत. तीच चाकोरी १०+२+३ या पद्धतीतही चालू राहिली. त्यामुळे +२ च्या टप्प्यावर चाळण लागण्याऐवजी विद्यार्थ्यांचा लोंढा +३ या टप्प्यापर्यंतही पोचू लागला आणि मूळ समस्या अधिकच बिकट बनली. त्याचबरोबर 'नोकरीसाठी पदवी' ही अटही सरकारनं तशीच ठेवली. साहजिकच पोटापाण्यासाठी नोकरी हवी, नोकरीसाठी पदवी आणि पदवी मिळवायलाच पाहिजे म्हणून मग कसंही करून परीक्षेत उत्तीर्ण होणं अपरिहार्य बनून गेल आहे. खरं म्हणजे कारकुनाच्या नोकरीसाठी पदवीची गरजच काय ? दहावीनंतर विशिष्ट प्रशिक्षण घेऊन कारकुनाचं काम करता येणं एवढं का अशक्य आहे ? हाच प्रकार इतरही तत्सम नोकऱ्यांबाबत खरा आहे. उदाहरणार्थ, हिशेबनीसाच्या पदासाठी वाणिज्य विषयातील पदवीची इतकी खरोखरच गरज असते काय ? हिशेब कसे ठेवायचे, हे दहावीनंतर विद्यार्थ्याला सहजरित्या शिकवणं इतकं का अवघड आहे ?

ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असताना सरकार आणि शिक्षणक्षेत्रातील दिग्गज त्यावर मूग गिळून बसतात. याचं मुख्य कारण म्हणजे सध्याच्या व्यवस्थेत यापैकी बहुसंख्यांचे हितसंबंध निर्माण झाले आहेत. बालगंदाखल विनाअनुदानाचं जे नवं कुरण शिक्षणक्षेत्रात फोफावल,

घराला मुलांशिवाय तशी अंगणाला झाडांशिवाय शोभा नाही.

त्याकडं बघता येईल. शिक्षणक्षेत्रात उच्चवर्गीय, उच्चवर्णीय यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे आणि त्यामुळे ग्रामीण भागातील होतकरू मुलांना साधनसुविधांच्या अभावी शिक्षणापासून वंचित रहावं लागत आहे, असा युक्तिवाद करून विनाअनुदान तत्त्वावर शाळा पदवी महाविद्यालय आणि अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालय उघडण्यास मुक्तद्वार देण्यात आलं. मग साखर कारखानदारी, सहकारी चळवळ यात 'सम्राट' बनलेल्यांपैकीच अनेकांनी शिक्षणक्षेत्रातही 'सम्राट' बनण्याचा चंग बांधला. आज महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांत असे शिक्षणसम्राट निर्माण झाले आहेत आणि डीएड्., बीएड्. अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांची दुकानं त्यांनी उघडली आहेत. अर्थात ग्रामीण भागातील खऱ्या होतकरू मुलांना या नव्या शिक्षण संस्थांचा फारसा फायदा झालेलाच नाही. या संस्थांतील बहुतांश जागा या गलेलठ्ठ देणगी देणाऱ्या धनवानांच्या मुलांनाच मिळत आल्या आहेत. अलिकडेच अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांतील 'एनआरआय' कोट्याचा जो वाद झाला आणि त्यातून उच्च न्यायालयाला जो आदेश द्यावा लागला, ते या वास्तवाचे उत्तम उदाहरण आहे.

तात्पर्य म्हणजे शिक्षणव्यवस्थेचं खरं दुखणं दूर व्हावं, असं वाटत असेल, तर सध्या निर्माण झालेल्या हितसंबंधांना कठोरपणे मोडून काढावे लागेल. नोकरीसाठी पदवीची अट तावडतोब काढून टाकावी लागेल. व्यावसायिक शिक्षण देणारी केंद्रे स्थापन करण्यास प्राधान्य देणे क्रमप्राप्त आहे. अर्थात आता हे व्यावसायिक शिक्षण हे केवळ कलांचे (Trade's) देऊन भागणार नाही. आज आपण २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. आगामी शतकातील स्थित्यंतरामागची खरी शक्ती ही तंत्रज्ञान हीच राहणार आहे. मात्र अत्याधुनिक तंत्रज्ञान म्हणजे प्रत्येकाने अभियांत्रिकी पदवी वा पदव्युत्तर अभ्यासक्रम पुरा करायलाच हवा असे नाही. तंत्रज्ञानाचेही टप्पे असतात आणि या प्रत्येक टप्प्यावर विविध प्रकारच्या प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज भासते. उदाहरणार्थ, संगणक वापरणे, तो दुरुस्त करणे, तो बनविणे, त्याची आज्ञावली (सॉफ्टवेअर) विकसित करणे, अत्याधुनिक संगणक शोधून काढणे असे विविध टप्पे या क्षेत्रात आहेत. यापैकी शेवटच्या एक दोन टप्प्यांसाठीच उच्च वा अत्युच्च शिक्षण आवश्यक ठरते. इतर टप्प्यांवर विशिष्ट प्रशिक्षण पुरेसे ठरते आणि त्यासाठी पदवीचीही जरुरी नसते.

असा दृष्टिकोन ठेवून निकराने योग्य दिशेने बदल करण्याचा प्रयत्न झाल्यासच शिक्षण क्षेत्रांचं दुखणं दूर होण्याची शक्यता आहे. तसं बघायला गेल्यास या शिक्षणक्षेत्राचे ग्राहक असलेले विद्यार्थी आणि पर्यायाने त्यांचे पालक यांना हा बदल हितकारक ठरणार आहे. पण पैसा, त्यामुळे येणारी प्रतिष्ठा आणि या प्रतिष्ठेसाठी कोणत्याही मार्गाने पैसा मिळवणं, याला आपल्या समाजात मान्यता मिळत चालली आहे. या प्रवृत्तीपायी अनेक पालक व त्यांची मुले ही विनदिक्कतपणे शिक्षणक्षेत्रातील हितसंबंधियांच्या हातात हात मिळवायला तयार असतात.

याचा अपरिहार्य परिणाम शिक्षणक्षेत्रात बाजारूपणा फोफावण्यात झाला आहे. 'मागणी तसा पुरवठा' आणि 'दाम देईल काम' हीच या क्षेत्राची ब्रीदवाक्ये बनली आहेत.

म्हणून ही कीड समूळ उपटून टाकण्यासाठी कोण पुढाकार घेणार आणि जो पुढाकार घेईल त्याच्यामागे कोण उभा राहणार हा खरा यक्षप्रश्न आहे. !

**प्रकाश बाळ**

• • •

# यत्नांचा वन्ही प्रज्वलित करा

सौ. उषा ज. कळमकर

*दासबोध हा स्वामी समर्थ रामदासांचा प्रेरणादायी ग्रंथ. या ग्रंथात प्रयत्नांचे महत्त्व त्यांनी कसे विषद केले आहे याचा थोडक्यात घेतलेला आढावा. - संपादक*

मानवी जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडवणारा श्रीसमर्थांचा 'दासबोध' हा अध्यात्म ग्रंथांचा राजा आहे. पण आजच्या युवा पिढीसाठी तो 'कानमंत्रबोध' वाटावा असा आहे. आजच्या जीवघेण्या स्पर्धात्मक जीवनातील दुःख नाहीसे करुन मनाला समाधानी कसे करावे ? या महागाईच्या भस्मासुरात, शिक्षणाच्या बाजारुपणात, मनाच्या 'कमकुवत' या रोगाला, भ्रष्टाचाराने बोकाळलेल्या विचारांमधून आनंदी कसे व्हावे आणि मिळालेला आनंद सर्वांना कसा द्यावा ह्याचे सुबोध मार्गदर्शन संत रामदासांनी ग्रंथराज दासबोधात केले आहे. या ग्रंथाचा अभ्यास, वाचन केल्याने पापी पुण्यवान होतील, पतितांचा उद्धार होईल, वगैरे लाभ आहेतच, पण तरुणांसाठी लक्षात ठेवावयाचे म्हणजे आळशी प्रयत्नशील बनतील. ह्या विचाराकडे लक्ष वेधणे हाच ह्या लेखाचा हेतू आहे.

आळशी सुख मानू नये ।
सुखा आंग देऊ नये ।

कारण आळसामुळे विचार, आचार, पाठांतर, श्रवण, निरुपण होत नाही. तसेच नित्यनेम, अभ्यासही आळसामुळे बुडतात. वृत्ती मलीन होते.

अर्थातच त्यामुळे बुद्धीची ज्ञान धारणशक्ती, प्रचंड अभ्यासाचे दाखवलेले धैर्य, मोठ्ठ होण्याची महत्वाकांक्षा, चांगल्याचीच कास धरण्याची शक्ती म्हणजे विवेक मंद मंद होत जातो. निद्रा अधिक येते. सद्बुद्धी शून्याकार होते. अखेरीस आयुष्याचा नाश होतो.

निद्रा आळस दुश्चितपण । हेचि मूर्खांचे लक्षण ।

असल्यामुळे ज्ञानाला प्राप्त करणे, ते पुन्हा स्मरणे, त्याचा ध्यास करणे वगैरे क्रियांसाठी आवश्यक असणारे चित्तच एकाग्र होऊ शकत नाही. मग विद्यार्थी जीवनातील जे साध्य आहे तेच प्राप्त करता येत नाही. मग विद्यार्थी जीवनात कुणाला अभिनेता, कुणाला गायक, कुणाला प्राध्यापक, कुणाला चित्रकार व्हायचे आहे. पण आळसामुळे व्यक्तिमत्त्वाच्या घडणीसाठी निरलस प्रयत्न करता येत नाही. आळसाने काम नासते हा तर प्रत्यक्ष अनुभव आहे. कष्टाचे दुःख जे आधी सोसतात त्यांना पुढे सुख मिळते. पण आधी आळसाने जे सुखावतात त्यांना पुढे कष्ट भोगावे लागतात.

कष्टेवीण फळ नाही । कष्टेवीण राज्य नाही ।
केल्याविण होत नाही । साध्य जनी ॥

म्हणून आळस सोडून तळमळीने मनापासून पूर्ण प्रयत्न करावे म्हणजे सुखसंतोष, यश, कीर्ती, मानसन्मान, गौरव आपोआपच प्राप्त होतील. म्हणून

आलस्य अवघाचि दवडावा । यत्न उदंडचि करावा ॥

'मग कंटाळा आला', 'काय, रोज तेच तेच काम करायचे ग?' 'काय कंटाळवाण्या त्या परीक्षा नि तो अभ्यास' वगैरे उणेपणा, मनुष्य स्वभावाचे हे दोष पार नाहीसे होतील. प्रत्येक व्यक्तीचा हा निश्चय प्रयत्नवाद समष्टी तयार करेल. यत्न उदंड करण्यात विद्यार्थी आपलाच आपण उद्धार करु

लागतील. दैववाद, प्रारब्ध रेषा वगैरे शब्दप्रयोग लटके ठरतील. प्रयत्नवादच श्रेष्ठ ठरेल.

केलियाने होते केलेचि पाहिजे ।

जे मनी धरिणे तेची होते ॥

हा प्रयत्नवादाचा समर्थ रामदासांचा सिद्धांत तरुणांना पटेल. प्रारब्धात असेल तरच पूर्वरेखेप्रमाणे प्रयत्न होईल हा कार्यकारणभाव बरोबर नाही.

पाहिजे तो यत्न आदरेसि केला ।


मग प्रामण्याला शब्द घडे ॥

हे तरुणांनो, आधी आदरपूर्वक काळजीपूर्वक निरलसतेने अचूक यत्न करा आणि मग प्रारब्धाच्या गोष्टी बोला. यत्न कसा व कोणता करावा हे तरुणांना न समजण्याचे कारण म्हणजे त्यांचा बौद्धिक व शारीरिक आळस हे आहे. तो टाकला पाहिजे. जे काही होते ते प्रयत्नांवाचून, केल्यावाचून होत नाही म्हणून आधी प्रयत्न केला पाहिजे. आजच्या विज्ञानयुगात, २१व्या शतकाच्या वाटचालीतही प्रारब्ध आणि प्रयत्न यात प्रयत्नच श्रेष्ठ आहे हेच माझेही ठाम मत आहे. म्हणून आळस म्हणजे महापाप. आळस खोटा आहे. तरी विद्यार्थ्यांनीच नव्हे तर प्रत्येकाने यत्न करता करता लक्ष्मी व सरस्वतीचे ज्ञान घेऊन वैभवसंपन्न व्हावे. त्यासाठी करंट्या आळसाचा तिटकारा व प्रयत्नवादाचा पुरस्कारच करावा.

**सौ. उषा जयंत कळमकर**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे.

• • •

*With Best Compliments from*



**SUPREME MOTORS**

42, Raval Building, Lamington Road, Mumbai - 400 004.

**Phone :** 387 7315 / 380 7316 / 382 8238
**Fax :** 022-38071316
email : supremot@bom5.vsnl.net.in
**Sales Counter Phone :** 2308131

*House of : L.C.Vs. SUMO SPARE PARTS*

देव नसतो दगडात, तो तर निसर्गात !

# मराठी संतांचा गणेश


शैला जोगळेकर

*या महिन्यात गणपती उत्सवाचे दिवस येत आहेत. गणपती संबंधांत अनेक ठिकाणी अनेक लेख छापले जातील. या लेखात मात्र एक वेगळा विषय थोडक्यात मांडला आहे. - संपादक*

श्रीगणेश ही देवता शब्दब्रह्म जो ओंकार त्याचे प्रतीक असल्यामुळे कोणत्याही धार्मिक मंगलकार्यास श्रीगणेशाचे पूजन केल्या खेरीज प्रारंभच होऊ शकत नाही. ॐकार या नादमय शब्दात अव्यक्त परब्रह्माचे पहिले व्यक्त स्वरुप आहे व त्या ओंकाराचेच श्रीगणपती देवता हे व्यक्त स्वरुप आहे, असे श्री गणपती अथर्वशीर्षात म्हटले आहे. तसेच 'तत्त्वमसि' या महावाक्यातच गणेश तत्त्व प्रकट झालेले आहे.

ब्रह्म, विष्णू आणि रुद्र यांच्यातील तीन गुणांच्या विभागांना शास्त्रात 'गुणांना ईशः गुणेशः' असे म्हटले आहे. तर ॐइत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन् असे श्रीमद्‌भगवत्‌गीतेत सांगितले आहे. हाती घेतलेला ग्रंथ निर्विघ्न पूर्ण व्हावा, त्याची अध्यापन परंपरा अविच्छिन्न चालावी आणि शिष्टाचाराचे परिपालन व्हावे म्हणून ग्रंथारंभी मंगलाचरण करतात. अनेक संतकवींनीही स्वतःची इष्टदेवता श्रीगजाननाला नमन करून स्वतःच्या गुरुपरंपरेची महती गाऊन ग्रंथ रचनेचा हेतू सांगितलेला दिसतो. मराठीत ज्ञानेश्वरांपासून ते आजतागायत सर्व कवींनी श्रीगणेश स्तवन केले आहे.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातील १ ते २० ओव्यांत श्री गणेश स्तवन केले आहे. सुरुवातीलाच 'ॐनमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरुपा ॥ देवा तूचि गणेशु' असे ते ओंकार स्वरुपात श्री गणेश स्तवन करतात. कारण त्यात मूलरुपाची अमूर्त व रचनामूल अशी आदिबंधात्मक रचना आहे.



संत एकनाथांनी एकनाथी भागवतातील पहिल्या अध्यायातील १ ते १६ ओव्यात श्री गणेश स्तवन केले आहे. सुरुवातीला ते 'श्री गणाधिपतये नमः ।' असे म्हणतात, तर भावार्थ रामायणातील बालकांडाच्या पहिल्या अध्यायात अगदी थेट ज्ञानेश्वरासारखे गणेशस्तवन करतात. ते असे, 'ॐ नमो अनादि आद्या । वेद वेदांत वंद्या । वंद्य ही परम वंद्या । स्वसंवेद्या श्री गणेशा ॥' संत ज्ञानेश्वरांनी व संत एकनाथांनी केलेल्या गणेश स्तवनात पुष्कळच साधर्म्य आहे.

संत नामदेवांनी बालक्रीडेच्या अभंगात व संत तुकारामांनी आपल्या गाथेत श्री गणेश स्तवन केले आहे. संत नामदेवांनी श्री गणेशाला उद्देशून 'लंबोदरा, उंदीरवाहना पार्वती नंदना' असे शब्द वापरले आहेत, तर संत तुकाराम महाराजांनी 'धरोनिया परश करी । भक्तजनांची विघ्ने वारी। ऐसा गजानन महाराजा ।' या शब्दात श्री गणेशाची स्तुती केली आहे.

सर्व संत कवींमधे समर्थ रामदासांनी श्री गणेशाचे अनेक प्रकारे जे उत्कृष्ट स्तवन केले आहे त्याची थोडीशी झलक अशी, समर्थ म्हणतात, ' गणपती मति दे मज लाघवी। जनकजापतिचा लघु सा कवी ।' आरत्या, करुणास्तोत्रे, लघु रामचरित्र, दासबोध यामधे समर्थ रामदासांनी प्रामुख्याने श्री गणेशस्तवन केले आहे. दासबोधात पहिल्या दशकाच्या दुसऱ्या समासातील १ ते ३० या ओवीत श्री गणेशस्तवन येते. त्याची सुरवात 'ॐ नमोजी गणनायका' या शब्दात त्यांनी केली आहे. त्यांच्या गणेशस्तवनात नृत्याचा उल्लेख आहे. श्री गजाननाच्या नृत्याच्या संदर्भात एकूण पाच ओव्या आलेल्या आहेत. त्यातील काही ओव्या अशा, 'लवथवित मलपे दोंदे । वेष्टित कटूट नागबंध । क्षुद्र घंटिका मंदमंद वाजती झणत्कारे' किंवा 'सगुण रुपाची ठेव । महालावण्य लाघव । नृत्य करिता सकळ दे । सकळ देव तटस्थ होती । चौदा विद्यांचा गोसावी। हस्त लोचन ते हिलावी ।' श्री गणेश नृत्य करीत आहे व त्या संदर्भात हस्त व लोचनांच्या हालचाली करीत आहे. असे नृत्य करणाऱ्या त्या श्री गणेशासंबंधी वरील वर्णन आहे. श्री गणेशाच्या कटीवर नागबंध आहे त्या नागबंधाला लहान लहान घंटा लावल्या असून त्याचा मंद आवाज होत आहे. कारण नट नाट्य कला कुसरी । नाना छंदे नृत्य करी। टाळ मृदुंग बरोबरी । उपांग हुंकारे ।' टाळ आणि मृदुगांच्या घोषात श्री गजानन नृत्य करीत आहे व कला कुसरीने युक्त आहे. घंटा मंद मंद वाजत असून नृत्यही शांतपणे चालले आहे. गायन, वादन व नर्तन या तीनही कलांचा संगम संगीतात होतो हे समर्थांनी श्री गणेशाच्या नृत्याच्या संदर्भातच सुचविले आहे. 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही त्याची आरती म्हणजे अत्युच्च पदवीचा पारमार्थिक अनुभवच आहे.

समर्थ रामदासांच्या लघुरामचरित्रात जे श्री गणेशस्तवन आले आहे त्यात चरणांतर्गत नादबंधाचा एक वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार दिसतो तो असा 'तनू वितंड चंडसी। प्रचंड शुंड दंडसी । सुरंग रंग रेखिला । घवघवीत देखिला । नमू गणेश तो गुणी । विराजतो विभूषणी । जनासी सौख्यकारकू । विशाल विघ्न हारकू ॥'

शब्द हा श्रवणाचा विषय आहे व अर्थयुक्त शब्दाने नृत्यामध्ये काव्यकलेचे बीज पेरले गेल्यामुळे रामदासांचे श्री गणेशस्तवन विशेषच लक्ष वेधून घेते. साक्षात्कारातील अनुभूतीचे वर्णन करताना समर्थ रामदासांच्या वाणीतून रोकडेपणाने बाहेर पडलेले शब्द वाचताना रामदासांच्या वाक्चातुर्याने व सौंदर्य दृष्टीने आपण हरवून जातो

**शैला जोगळेकर**
पोर्तुगीजचर्च, दादर

• • •

"अहो ऐकलत का ?" चंपुकाकी आपल्या पतिराजांना म्हणाल्या "हा पोपट पाळून दोन वर्षे झाली. पण एक शब्द बोलेल तर शपथ...."

" अग हो पण तू त्याला बोलू देशील तर ना?" पतिराज म्हणाले.

# मेहतर समाजाची व्यथा

श्री. जगदीश खैरालिया

*सफाई कामगार ! एक उपेक्षित समाज घटक. या सफाई कामगारांसाठी अनेक योजना आखल्या जातात, घोषणा होतात... पण सर्व कागदावरच रहाते. या समाजाची व्यथा आजही संपलेली नाही. जगदीश खैरालिया यांनी याचाच परामर्श या लेखात घेतला आहे. - संपादक*

सफाई कामगार म्हटलं की कोणाचाही हात रुमालासह नाका तोंडावर जातोच ! सफाई कामगार म्हणजे घाणीतला राजा ! घाणीत काम करीत असल्यामुळे सफाई कामगारांच्या नशिबी घृणा, तिरस्कार आणि अस्पृश्यताच लाभली. त्यांचे राहणीमान, शिक्षण, व्यवसाय आदी संपूर्ण जीवनच इतर समाजांपासून वेगळे असेच राहिलेले आहे.

चातुवर्ण्य व्यवस्थेने चार वर्णांची रचना करून दलित समाजाला शुद्र म्हणूनच वागवले आहे. त्यामुळे फक्त समाजाची सेवा करणे हेच त्यांचे पुण्य कर्म ! सफाई काम करणाऱ्या विविध जातीच्या लोकांचा मात्र अतिशूद्र या पाचव्या वर्णात समावेश होतो. आणि म्हणूनच सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा या पासून या समाजाला नेहमीच वंचित राखण्याचे जाणीव पूर्वक प्रयत्न झालेले आहेत. परंतु सफाई कामगारांमध्येही ज्यांनी मानवीय मलमूत्र डोक्यावरुन वाहण्याचे महत्वपूर्ण काम करुन समाजाची सेवा केली. त्या मेहतर समाजाला सफाई काम करणाऱ्या एकाच व्यवसायातील जातींमध्ये ही कमी लेखण्यात येते ही मात्र भारतीय जातीव्यवस्थेची खरी शोकांतिका आहे.

शहरीकरण आणि औद्योगिकीकरण सुरु झाले तेव्हा मुंबईसह अनेक शहरांच्या जडण घडणीमध्ये मेहतर समाजाने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. शहरे विकसित होताना साफ सफाईच्या कामात कोरडे रस्ते सफाईची कामे महाराष्ट्रातील स्थानिक अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातीच्या लोकांनी स्वीकारली. मात्र सांडपाणी वाहण्याची योग्य व्यवस्था नसल्याने संडास सफाईची (मैला सफाई) कामे कोण करणार? ही विकट समस्या बनली होती. सर्वत्र रोगराई पसरली. घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे मृत्यूचे प्रमाण खूप वाढले होते. त्यावेळी मैला सफाईच्या कामासाठी उत्तर प्रदेश, हरियाना, राजस्थान, गुजरात, दिल्ली, पंजाब, मध्यप्रदेश आदी राज्यांमधून वाल्मिकी, रुखी, धेड, हलालखोर, डोम, लालबेगी, मेहतर, मायाव्हंशी, मखेवाल ई. अनेक अस्पृश्य जातीच्या लोकांची महाराष्ट्रात आयात करण्यात आली होती. त्यावेळी 'भंगीकाम' करणाऱ्यांना विशेष अमिषे देऊन बोलाविण्यात आले. व्यवहारात किती ही हीन समजले तरी मैला सफाईच्या कामाची गरज म्हणून त्याकाळी मेहतर समाजाला 'घाणीतला राजा' म्हणून विशेष महत्व दिलं जात होतं. त्यांना त्यावेळी जास्त पगार दिला जायचा. हे मुंबई, नाशिक आणि इतर अनेक नगरपरिषेदांच्या त्या वेळच्या वार्षिक अहवालावरुन अधिक स्पष्ट होते. आज ही संडास सफाईच्या कामासाठी वाल्मिकी किंवा रुखी समाजातील कामगारानांच पाठविले जाते. सफाई कामगारांना कामाचे वाटप करताना संडास सफाई, रस्त्यावरचा मैला उचलणे, स्मशान भूमित बेवारस प्रेतांची विल्हेवाट लावणे, हॉस्पिटल मध्ये मृत प्रेतांची चिरफाड किंवा मेलेल्या जनावरांचे (कुत्रा, उंदीर) उचलणे ही कामे अजूनही या विशिष्ट जातीच्या लोकांनाच दिली जातात. त्यामुळे सफाई कामात सुद्धा जातीय आधारावरच ही अलिखित विभागणी केलेले दिसते. मात्र मेहतर समाजाला सरकारी सवलती देतांना सावत्रपणाची वागणूक देऊन त्यांना

विकासा पासून दूर ठेवण्याचे काम जाणीव पूर्वक केले जात आहे. मेहतर समाज सफाई कामगारमध्ये अति मागासलेला घटक असून देखील या समाजातील शिकलेला तरुण पिढीला कोणत्याही सरकारी योजनांचा लाभ घेता येत नाही.

मेहतर समाजातील लोक नेहमीच गावा बाहेर एखाद्या डम्पींग ग्राउंड जवळ झोपडपट्टीत रहात. शाळेच्या दरवाज्याजवळ उभे रहाण्याची त्यांना समाजाने परवानगी दिली नव्हती.त्यामुळे फक्त 'पोट भरण्यापुरतं जिणे' हीच दैनंदिनी असल्यामुळे या समाजात अशिक्षित आणि अडाणीपणामुळे, त्यांना स्वत:चे अस्तित्वाची जाण ही कधी राहिली नाही. साधं रेशन कार्ड बनवून घेण्याची दखल त्यांनी कधी घेतली नव्हती. आता गेल्या एक दोन दशका पासून रेशनकार्ड बनवून घेणे किंवा मुलांना शिकविण्याबद्दल या समाजात जागृती व्हायला लागली आहे. त्यामुळेच आता नवी पिढी शिकून पुढे येत आहे. परंतु या तरुण पिढीला आपल्या पूर्वजांच्या पारंपारिक सफाईचा व्यवसाय नाकारताना सरकारी योजनांचे किंवा आरक्षणाचा लाभ मिळत नाहीत. पूर्वजांनी वास्तव्याचे पुरावे सांभाळून ठेवले नाही म्हणून जातीचा दाखला मिळण्यासाठी महाराष्ट्रात १९५० पासून वास्तव्य करीत असल्याचा पुरावा आणायचा कुठून ? हा प्रश्न या तरुणांपुढे उभा आहे. १५-२० वर्षा पूर्वी जो पर्यंत मेहतर समाजातील विविध घटकांमध्ये राखीव जागा आणि सरकारी सवलतींचा लाभ घेण्यासाठी कोणी उपलब्ध नव्हते. तेव्हा मात्र जातीचा दाखला देताना अशा प्रकारच्या कायदेशीर अडचणी कधी ही उभ्या राहिल्या नव्हत्या. परंतु आता जेव्हा या समाजात शैक्षणिक जागृती होत आहे. नवी पिढी उच्च शिक्षण घेऊ इच्छिते परंपरागत व्यवसाय बदलू इच्छितात तेव्हा मात्र जातीचा दाखला मिळविण्यासाठी अनेक तांत्रिक अडचणी उभ्या केल्या जात आहेत. ज्यांचा जन्मच महाराष्ट्रात झाला आहे अशा लोकांना 'उपरे' ठरवून जातीचा दाखला नाकारून सरकारी सवलती नाकारणे कितपत योग्य आहे ?

**सरकारच्या अनेक क्रांतीकारी योजना ! पण उपयोग, काय?**

केंद्र तथा महाराष्ट्र राज्य सरकारने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मेहतर समाज-सफाई कामगारांच्या उन्नतीसाठी अनेक वेळा समित्या नेमल्या आहेत. अनेक आयोग ही नेमले आहेत. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ५३ वर्षे झाली तरी या समाजाला न्याय मिळू शकला नाही. आतापर्यंत प्रा. एन.आर. मलकानी, बर्वे, व्ही.बी. लाड, श्री. भानूप्रसाद पांड्ये, भंगी परिवार निरीक्षण समिती,, सफाई कर्मचारी आयोग, मेहतर सर्वांगिण विकास समिती ई. अनेक कमिट्यांच्या माध्यमातून मेहतर समाजाची पहाणी केली आहे. या सर्व समित्यांनी मेहतर समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नती साठी अनेक योजना सुचविलेल्या आहेत. १९७२ साली नेमलेल्या लाड समितीने १९७४ साली आपल्या अहवालाद्वारे अनेक शिफारशी केल्या आहेत. लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगार वस्त्यांमध्ये बालवाडी, संस्कार केंद्र, वाचनालय, कामगार कल्याण केंद्र, पाळणाघर इ. सुरु करावेत. सफाई कामगारांच्या मुलांना व सफाई कामगारांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करावे व व्यवसाय परिवर्तनासाठी इतर व्यवसायामध्ये शिक्षण देऊन प्राधान्य द्यावे. राहते घर वाचविण्यासाठी शिकलेल्या तरुणांनी हातात झाडू धरु नये. म्हणून महापालिका, नगरपालिकाने सफाई कामगारांना कायमची मालकीची स्वस्त घरे देण्याची योजना राबवावी. असे सुचविले आहे. लाड समितीने सुचविलेल्या या योजनांच्या साठी राज्य सरकारने जी.आर. ही काढले आहेत. परंतु महापालिका आणि नगरपालिका या योजनांची अंमलबजावणी करीत नाही. त्यामुळे लाड समितीच्या शिफारशीना कायद्यात रुपांतर करुन अंमलबजावणी सक्तीची करणे आवश्यक आहे.

**असंघटित सफाई कामगारांचे प्रश्न**

गावी जमीनदार, मोठे वाडे असणाऱ्या श्रीमंताकडे

सफाई करण्याची पद्धत फार जुनी आहे. अनेकांच्या स्त्रिया घराबाहेर पडत नाहीत म्हणून ग्रामीण भागातील टोपली संडास (पायखाना) सफाईची कामे मेहतर समाजाचे लोकांना करावी लागत. शहरांचा विकास झाला आणि बहुमजली इमारती उभ्या राहिल्या. अनेक मोठ मोठ्या कॉलनी झाल्या. सार्वजनिक ठिकाणी साफ सफाईची कामे महापालिका/नगरपालिका किंवा ग्रामपंचायती मार्फत केली जातात. त्यामुळे तेथील कामगार संगठित होऊ शकतात. परंतु खाजगी गृहनिर्माण संस्था किंवा अन्य संस्थांमध्ये काम करणारे सफाई कामगारांचा रोजगार असुरक्षित आणि असंघटित असा आहे. अत्यल्प वेतन, घराघरातून वेतन जमा करण्याची पद्धत, रोजगार असुरक्षित असून मालकाची मर्जी सांभाळली नाही तर दुसऱ्या दिवसापासून कामावरुन काढून टाकतात. त्यामुळे १०-१५ वर्षे काम करुन देखील पगारवाढी बाबत मागणी करता येत नाही. त्यामुळे दिवसभर राबून देखील गुजराण करणे कठीण जाते. कुटुंबातील जवळ जवळ सारे जण कुठे ना कुठे सफईची कामे करतात. त्याचाच परिणाम म्हणून या समाजातील मुले शिक्षणापासून दूर राहतात. परिणामी दारु, जुगार ई. अनेक व्यसनांमध्ये आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडे या समाजातील तरुण मुले जास्त प्रमाणात वळलेली दिसतात. या तरुणांना योग्य मार्गदर्शन आणि रोजगाराची साधने उपलब्ध करुन देणे आज काळाची गरज आहे.

**प्रशासकीय यंत्रणेचे अपयश !**

सफाई काम करण्यासाठी अनेक नव्या तंत्रांचा उपयोग करावा अशा सूचना आणि योजना ही आखल्या जात आहे. 'टोपली संडास' पद्धत बंद करण्यासाठी कोरड्या संडासाचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न म्हणून या प्रश्नांची चर्चा संसदेत व काही राज्यांच्या विधानसभांत वेळोवेळी झाली. परंतु आज ही काही मोठी शहरे सोडली तर देशभरात पद्धत संपलेली नाही. कोरड्या संडासांवर बंदी घालणारा कायदा संसदेने १९९३ साली संमत केला. परंतु अद्यापि अनेक राज्यांनी त्याला संमती दिलेली नाही. त्यामुळे हा कायदा कागदावरच राहिलेला आहे. देशभरातील अनेक नगरपालिका त्यांच्या सफाई कर्मचाऱ्यांना सहा-सहा महिने पगार देत नाहीत. सरकार अनेक योजना राबविते. समाजातील उपेक्षित व मागासलेल्या वर्गांबाबत आपल्याला फार आस्था आहे असे दाखविण्याची स्पर्धाच राजकीय पक्षांमध्ये लागलेली दिसते. पण अनेकदा हे पोकळ राजकीय घोषणे पुरतेच मर्यादीत असते. हे सफाई कामगार मेहतर समाजाच्या आजच्या स्थितीवरुन लक्षात येते.

सफाई कर्मचारी आणि त्यांचे अश्रितांच्या मुक्ती एवं पुनर्वसनाची राष्ट्रीय योजना केंद्र सरकारने आखली. योजना आयोगाने गठित कार्यदलाने २१ मार्च १९९१ ला त्यांचा रिपोर्ट सादर केला. त्यानुसार ८३ टक्के सफाई कर्मचारी शहरी भागात आणि १७ टक्के सफाई कर्मचारी ग्रामीण भागात आहेत. यात ३५ टक्के महिला कर्मचारी असल्याचे निष्पन्न झाले आहे. टास्क फोर्स च्या रिपोर्टानुसार सफाई कर्मचाऱ्यांची मुक्ती तथा पुनर्वसनाच्या राष्ट्रीय योजनानुसार पहाणीच्या माध्यमातून सफाई कर्मचाऱ्यांची आणि त्यांच्या अश्रित कुटुंबियांची ओळख आणि पर्यायी वैकल्पिक व्यवसायांसाठी जागृतीचा समयबद्ध कार्यक्रम ठरविणे, केंद्र सरकार, राज्य सरकारचे विविध विभाग आणि अन्य अर्धसरकारी तथा गैर सरकारी संस्था संगठनाचे क्षेत्रीय प्रशिक्षण संस्था/ केंद्राद्वारे सफाई कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना निर्धारित व्यवसायाचे प्रशिक्षण देणे, सफाई कर्मचाऱ्यांना विविध व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसाह्य मिळवून देणे. ई. ची घोषणा केली. प्रशिक्षण आणि अर्थसाह्य याबर होणारा खर्च शंभर टक्के केंद्र सरकार करणार असल्याचेही ठरविले. मेहतर समाजातील सफाई कर्मचारी आणि त्यांच्या अश्रितांना सफाई कामाच्या परंपरागत व्यवसायातून मुक्ति मिळवून देण्यासाठी एक चरणबद्ध लक्ष्य गाठण्यासाठी निधीची (फंडाची) तरतूद ही केली होती. या प्रमाणे १९९२-९३

साली ८,४०० करोड, १९९३-९४ सालासाठी १३,००० करोड, १९९४-९५ सालासाठी १६,००० करोड, १९९५-९६ साली २०,००० करोड, १९९६-९७ साली २०,६०० करोड असे एकूण ८०,००० करोड रूपयांची ही योजना अंमलात आणून सफाई कर्मचारी आणि त्यांचे आश्रितांना वैकल्पिक आणि सन्मानजनक व्यवसायात पुनर्वसित करण्याचा निर्धार या द्वारे करण्यात आला होता. या योजनेच्या अंमलबजावणीचे पुन: पुनर्वलोकन करुन आता पर्यंत काय साध्य झाले याचा रिपोर्ट सादर करायला हवा. मात्र निवृत्त केंद्रीय गृहसचिव श्री. माधव गोडबोले यांनी 'वाट चुकलेले नियोजन' या विषयी २० जुलै ९९ रोजी 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये लिहिलेल्या लेखात राजकीय व प्रशासकीय इच्छा शक्तीच्या अभावामुळेच कायदा ही करुन ही कोरड्या संडासाचे निर्मूलन होत नसल्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. राष्ट्रीय मनवाअधिकार आयोगाची स्थापना झाल्यापासून देशातील अनेक सामाजिक राजकीय अन्यायाचे प्रश्न या आयोगाद्वारे पुढे आणले गेले आहेत. आता मानवीय मलमूत्र सफाईचा अमानवीय काम करणाऱ्या मेहतर समाजातील सफाई कामगारांना न्याय मिळविण्यासाथी राष्ट्रीय मनावधिकार आयोगाची मदत मागावी लागेल !

स्वातंत्र्य प्राप्तीच्या ५३ वर्षानंतर देखील या सामाजिक गुलामगिरी विरूद्ध मेहतर समाजातील प्रश्नांना पुढे आणून आता विविध समाज-संघटना रस्त्यावर येवून आंदोलने उभारु लागल्यामुळे महाराष्ट्रातील कामगार चळवळी पुरोगामी आंदोलने दलित-मागासवर्गीयांचे प्रश्न घेऊन आंदोलन करणाऱ्या संस्था/संघटनांना मेहतर समाजाच्या या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. हे या ठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते.

**जगदीश खैरालिया,**
निमंत्रक-सफाई कामगार सेना,
समाजवादी जनपरिषद, महाराष्ट्र
सिमेंट चाळ, स्टेडियम समोर, खारटन रोड, ठाणे (प).
दूरध्वनी : ५४३ २११४

•••

*With Best Compliments From*

**Polor Star**

15/A, Sopariwala Estate,
Prasad Chamber Compound,
Mumbai 400 004.

# वार्धक्य

सौ. वंदना सं. प्रसादे

*वार्धक्य ही जीवनातील अपरिहार्य अवस्था. कितीही नकोशी वाटली तरी या अवस्थेतून जावे लागते ही नियती आहे. या वार्धक्याबद्दल वंदना प्रसादे त्यांचे चिंतन या लेखात मांडत आहेत. - संपादक*

संध्याकाळच्या वेळी म्हणजे कातरवेळी मन उदास होते त्याचवेळी भा.रा. तांब्यांच्या कवितेतील ओळी जीवनाचा सारांशच सांगून जातात. 'ढळला रे ढळला दिन सखया, संध्या छाया भिववीती हृदया' हे स्वर कानी आले आणि मन उगीचच भयभीत झाले.

विज्ञानाने प्रगती केली. अनेक रोगांवर मात केली आणि आयुर्मान वाढले असे म्हणणे कितपत योग्य ठरणार आहे ? प्रदुषण, चिंता, महागाई, माणसांची बदललेली राहणी. संस्कृतीचा पडणारा विसर या अनेक गोष्टीतून परत आयुर्मान घटत आहे आणि एका रोगाचे निर्मूलन होताच दुसरा महाभयंकर रोग आपले डोके वर काढत आहे.

बालपण किती रम्य असते नंतर किशोरवस्था. तारुण्याची माणसाची रग ओसरायला लागते आणि वृद्धावस्था मनाला भयभीत करते. दात गेले, केस पांढरे झाले, ऐकू पण कमी येऊ लागले, कमी दिसू लागले ही लक्षणे वार्धक्याचे दरवाजे ठोठावत असतात. ते आपले स्वीकारायची तयारी नसते. आपले मन किती वेडं असतं. केस काळे करुन, खोटे दात लावून, कानाचे मशिन, चष्मा या गोष्टींनी आपण आपले वार्धक्य टाळू शकत नाही. डायबेटीस, ब्लडप्रेशर, संधीवात, मोतींबिंदू कधी तुमच्यात हजेरी लावतात ते समजतही नाही.

आपल्याला वाटते चांगले मजबूत खाऊन अति व्यायामाने शरीर मजबूत ठेवता येईल पण दात गेले म्हणजे आता चमचमीत न खाता लापशी, खिचडी असे पोटाला हलके अन्न घ्या, हे वार्धक्य सुचवित असते. खरंच वार्धक्याला माणूस घाबरतो. सत्य असले तरी ते आपल्याला टाळता येत नाही. 'सिनिअर सिटिझन' म्हणून त्यांना योग्य त्या सोयी देणे रास्तच आहे.

हातात काठी, चष्मा, सुरकुतलेले वाकलेले शरीर दुर्बल होत जाते आणि माणूस मनानेही खचत जातो. माणूस आपले तारुण्य आठवतो तेव्हाचा फोटो पाहिला तर केसांची झुलपे जाऊन तेथे तुरळक पांढरे केस दिसतात, खप्पड गाल, खोल डोळे असे रुप पूर्णत्वाला येत असते. वृद्धांची अवस्था अशी होते म्हणजे दुर्बलांचा साथी कोण? मावळत्या सूर्याला वंदन कोण करील ? यातून वाट्याला येतो तो एकलकोंडेपणा आणि वाढू लागते ती चिडचिड. दिवाणखान्यातील जागा आतील खोली घेते. दुलई ऐवजी शाल, स्कार्फ ऐवजी मफलर अशा वस्तू आजूबाजूला पसरतात. मनाच्या शांततेसाठी एखादे आध्यात्मिक पुस्तक आधार देते. त्यांनी दिलेला सल्ला 'जनरेशन गॅप'च्या नावाखाली डावलला जातो. आणि त्यांच्या वाट्याला येतात ती हलकी फुलकी पडीक कामे. शरीर अनेक व्याधींचे आगार बनते आणि काडी काडी जमविलेले डॉक्टरला देताना मनावर मणामणांच ओझं येतं.

हाताचा पाळणा करुन मुलांना वाढवलेलं असतं. कर्तव्यापायी स्वसुखाची होळी केलेली असते. आपल्या नशिबी आलं ते मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून ही धडपड. आपल्या पश्चात मुलांचे हाल होऊ नये म्हणून स्वतःच्या भविष्याबरोबर त्यांच्याही भविष्याची सोय केलेली असते. मुलांना शाळेत पोचवणे, सांभाळणे, दूध आणणे,

निरोप देणे, फोनवर निरोप घेणे, भाजी आणणे, बिल भरणे, जमेल तशी कामे वाट्याला येतात. होत नसले तरी 'मला सवय आहे' अशी स्वतःची खोटी समजून घालून स्वतःचे मन रमवत असतात. आणि असाच एखादा करंटा शेवटी त्यांना वृद्धाश्रमाची वाट दाखवतो. अनुभवांनी पिकलेल्या केसांना 'तुम्हाला काय कळतं?' अशी मुक्ताफळे कानी पडतात. जो पर्यंत या वृद्धांचा काही उपयोग होतो तो पर्यंत ते हवे असतात पण त्यांच्याच्याने काही होत नाही असे समजले की त्यांची अडगळ वाटू लागते. बरोबरीचे एकेक सोबती निघून जातात. आपला नंबर कधी असे जणू ते वाटच पहात असतात. काहींना आरोग्याचे वरदानच असते ते वयाच्या ७०/८० पर्यंत आपला धंदा (व्यवसाय) जोपासत असतात. त्यातून येणारे सल्ले आत्ताची पिढी निमूटपणे सहन करते कारण 'दुभत्या गाईच्या लाथा गोड' अशी परिस्थिती असते.

संध्याकाळच्या वेळी काही कट्टे, देवळे वृद्धांनी भरलेले दिसतात. फार काय रेल्वे प्लॅटफॉर्मवरचे बाकही जणू ते आपला गतकाळ शोधत असतात. आता नाना-नानी पार्क झाले आहेत पण हे सर्व बाह्य रुप आहे. घरातील वार्धक्य बोचरं असतं. जे मूल त्यांनी घडवण्यासाठी अनंत यातना सोसल्या. उपास - तापास केले तेच मूल त्यांच्यापुढे नतमस्तक व्हायलाही लाजतं.

घरातील निर्णय घेताना किमान मोठ्यांच्या कानावर काही गोष्टी घातल्या तरी त्यांच्या अस्तित्वाची जाणीवही त्यांना उभारी देऊन जाते.

जगाच्या पाठीवर वार्धक्य हा जणू शापच आहे. मानवाच्या या जीवनचक्रातून प्रत्येकाला जायचे आहे याची जाणीव प्रत्येकाने ठेवली तरी हे वार्धक्य सुसह्य होईल.

'मुकी अंगडी बाळपणाची, रंगीत वसने तारुण्याची
जीर्ण शाल मग उरे शेवटी लेणे वार्धक्याचे'

असे हे म्हातारपण ! विचारं होऊन जातं. आयुष्याची गाडी अंधाराच्या बोगद्यांत शिरते पण तेथे कोणीतरी प्रकाशवाट दाखवणारा नसतो.

अशी ही आयुष्याची मैफल संपत आलेली असते असे हे वार्धक्य कुणालाच नको असते. ययातीनेही तारुण्यासाठी स्वतःच्या पुत्राकडे हात पसरले पण कुणाचीही वृद्धावस्थेतून सुटका नाही आणि आयुष्यभर ताठ असलेली मान ईश्वरापुढे नतमस्तक होते.

सौ. वंदना प्रसादे
५०३, सिद्धांत अपार्टमेंटस्, भास्करकॉलनी, ठाणे
दूरध्वनी : ५४० ०६५२

• • •

(मलपृष्ठ २ वरून)

**संपादकीय**

**शांतता सहस्त्र परिषद**

समतोल राखणे या विषयीच्या परिषदेनंतर प्रसिद्ध केलेल्या पत्रकावर सह्या केल्या होत्या.

यापुढे कोणताही समाज धर्माने ओळखला जाणार नाही. परिषदेत सहभाग घेतलेल्या धार्मिक व आध्यात्मिक नेत्यांच्या भारताच्या आध्यात्मिक प्रगतीवरील भाषणांवर बऱ्याच वेळा सभागृह दणाणून गेले.

काही दिवसापूर्वी राजधानीत आलेल्या नॉर्वेच्या विदेशी मंत्री आणि युनोच्या जनरल असेंब्लीचे अध्यक्ष थिओबेन गुइरब हे परिषदेच्या कामाकाजा संबंधी व भविष्यातील शांतता प्रस्थापित करण्याची गरज याचा विचार करण्यासाठी आले असता त्यांनी यूनोचे २१व्या शतकातील राष्ट्राराष्ट्रातील शांततापूर्ण वातावरण टिकवण्यासाठी जगाच्या धार्मिक व आध्यात्मिक नेत्यांनी निर्माण केलेल्या संधीचा फायदा भविष्यातील विश्व शांतीसाठी घ्यावा लागेल असे विचार बोलून दाखवले.

खरोखर २१व्या शतकात असे घडावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

श्री. अ.धो. टिल्लू
संपादक

• • •

# तबल्याची लयकारी आणि सुरांची अदाकारी सहज साधणारा कलाकार - चंद्रशेखर वझे

सौ. मंजिरी दांडेकर

*कलाकाराचा जीवनप्रवास ही एक जडणघडण असते. तबला वादक म्हणून प्रसिद्ध असणारे श्री. चंद्रशेखर वझे गायकही कसे याचा वेध घेणारा हा लेख-संपादक*

चंद्रशेखर वझे हे आकाशवाणीतील संगीत विभागात काम करतात. हे काम करत असताना स्वतःची तबला वादनाची व शास्त्रीय संगीत गायनाची स्वतःची शैली विकसित करण्यासाठी सतत धडपडणाऱ्या श्री. चंद्रशेखर वझे यांना भेटण्याचा योग आला.

आईकडून नटवर्य मामा पेंडसे यांचे नातू व वडिलांकडून केळशीचे आदर्श शिक्षक प्रसिद्ध कीर्तनकार वैजनाथ वझे यांचे नातू असलेल्या चंद्रशेखर वझे यांना दोन्ही घराण्यातील कलेचा वारसा प्राप्त झाला. आज त्यांना रसिक यशस्वी नवोदित शास्त्रीय गायक म्हणून ओळखत असले तरी शास्त्रीय संगीताच्या विश्वात त्यांनी तबलावादक म्हणून पदार्पण केले होते.

तबल्याचे सुरुवातीचे शिक्षण व पुढची प्रगती याबद्दल विचारले असता ते म्हणाले, त्यांचे तबल्याचे सुरुवातीचे शिक्षण दिवा येथील बळवंत तांबे यांच्याकडे झाले. त्यानंतर थिरकवासाहेबांचे शिष्य आणि विक्रम गोखले यांचे काका लालजी गोखले यांच्याकडे पुढचे शिक्षण घेतले. सध्या ते उस्ताद अमीर हुसेन खाँ साहेबांचे शिष्य पं. सदाशिव पवार यांच्याकडे तबल्याचे शिक्षण घेत आहेत.

या वादनाच्या क्षेत्रातील पारितोषिकांसंबंधी विचारले असता ते म्हणाले वयाच्या १०व्या वर्षी १९७५ मध्ये त्यांना सुवर्ण साधना समिती, मुंबई या संस्थेच्या एकल तबला वादन स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. त्याच वर्षी कुनगोळ (कर्नाटक) येथील सवाई गंधर्व संगीत महोत्सवात त्यांना एकल तबलावादन करण्याची संधी मिळाली. या तीन दिवशीय समारोहात त्यांना सवाई गंधर्वांचे पट्टशिष्य नानासाहेब नाडगीर यांच्याकडून महत्त्वाची दाद मिळाली. १९७९ मध्ये त्यांना भारत सरकारची 'कल्चरल टॅलेन्ट रिसर्च' ही तबल्यासाठीची शिष्यवृत्ती मिळाली. १९९० व १९९४ साली त्यांनी अमेरिका, कॅनडा, बहारिन इ. देशांचा दौरा केला.



श्री. चंद्रशेखर वझे - तबला साथ देताना

मग तबल्याकडून गाण्याकडे कसे वळले हे सांगताना चंद्रशेखर म्हणाले शास्त्रीय गायनाकडे वळलो तरी तबला

मातीतच परमेश्वर हिरवागार सजून येतो.

सोडला नाही. घरात वडील उत्तम गात होते. रेल्वेतील नोकरी सांभाळून स्वतंत्र कार्यक्रम बसवत होते. आकाशवाणीवर संगीतही देत होते. त्यामुळे घरात गाणे सतत कानावर पडत होते. 'मारवा' या गाण्यास व वाजवण्यास अवघड समजल्या जाणाऱ्या रागाने वयाच्या १७ वर्षी शास्त्रीय गायनाचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. नंतर मुंबई विद्यापीठाचा शास्त्रीय संगीताचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. पं. अजय पोहनकर व पं. फिरोज दस्तूर यांच्याकडून मार्गदर्शन घेत असताना मुंबई विद्यापीठाची 'मास्टर ऑफ फाईन आर्ट' ही पदवी संपादन केली.

आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत हे दाखवण्याचा मोह कधी होतो का ? असे विचारताच त्यांनी नाही हेच उत्तर दिले. कारण त्यांचे मत असे की उपशास्त्रीय किंवा शास्त्रीय गायन रसिकांसमोर सादर करणारा गायक हा केवळ त्याच्या गुरुने शिकवण्यानुसार कला सादर करू लागला तर ती 'पोपटपंची' ठरेल. त्यांना मात्र घरी वडिलांकडून विचार करून प्रत्येक रागाचे चिजांचे त्यातील शब्दांचे प्रतिबिंब मनावर ठसवून मग ते रसिकांसमोर पेश करण्याचे बाळकडू मिळाले. त्यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत हे दाखविण्यासाठी आटापिटा करण्याचा मोह होत नाही. त्या ऐवजी गुरुंची शिकवण आत्मसात करून त्यावर विचार करून गायला जास्त आवडते.

तबल्याप्रमाणे गायनातही पारितोषिके मिळाली त्याबद्दल सांगताना ते म्हणाले की १९९० साली कलकत्ता येथील संगीत रिसर्च अकादमीची शास्त्रीय संगीताची शिष्यवृत्ती मिळाली. आकाशवाणीच्या ऑडिशनसाठी पाठवलेल्या ध्वनिफितीवरून 'ब' उच्च श्रेणी प्राप्त झाली. १९९४ साली 'सूरमणी' पुरस्कार मिळाला.

सादर झालेल्या कार्यक्रमांतील काही ठळक प्रसंग सांगा असे म्हटल्यावर त्यांनी पं. अजय पोहनकरांकडील गुरुपौर्णिमेचा प्रसंग सांगितला. या कार्यक्रमात सुरुवातीस पोहनकरांच्या गाण्याला तबला साथ केली आणि मग गायला बसले. समोर प्रेक्षकात बसलेल्या विंदा करंदीकरांनी चंद्रशेखरांनी गायिलेल्या 'मालकंस' ला मनसोक्त दाद दिली. तसेच एकदा तबला साथ करताना एकाने सांगितले की तुमचा तबला नुसता वाजत नाही तर तो गातो. या संदर्भात ते म्हणाले गायन आणि वादन एकमेकांना पोषक ठरेल. गायनाचं अंग असेल तर वादनही गायकीच्या अंगाने येत. त्यांच्या आवडीच्या गायकांसंदर्भात बोलताना ते म्हणाले,'पं. बसंतराव देशपांडे, पं. भीमसेन जोशी, पं. कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर यांची गायकी विशेष आवडते. मी स्वतः किराणा घराण्याचा पण तसा शिक्का मारलेला मला आवडत नाही. कारण वडिलांचे संस्कार. वडिलांनी मनावर बिंबवले की किराण्याच्या अंगाने जरूर गायच कारण तो गुरुंचा प्रसाद आहे. शिवाय किराणा घराण्याचे वैशिष्ट्य हे की स्वच्छ निखळ स्वर लावणे. त्याचप्रमाणे इतर घराण्यातील सौंदर्यस्थळे शोधून त्यांचा समावेश माझ्या गाण्यात करायला मला आवडेल.



**श्री. चंद्रशेखर वझे ब्राह्मण सेवा संघ, ठाणे येथे रसिकांसमोर गायन पेश करताना.**

गायन वादनाशिवाय तुम्ही काही केले का ? या संदर्भात त्यांनी स्वरसाधनेबाबत सांगितले. स्वरसाधनेचा त्यांनी स्वतः अभ्यास केला आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आवाजाची व्याप्ती ओळखून त्याप्रमाणे स्वर लावण्यावर माझा भर असतो.

तुमच्यासारखी तुमच्या विद्यार्थ्यांची काही प्रगती ?

माझ्याकडच्या दोन विद्यार्थ्यांना तबल्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

ते सादर करत असलेल्या कार्यक्रमासंदर्भात बोलताना ते म्हणाले की संत तुकारामांच्या अप्रचलित अभंगांवर 'अमर झाला तुका' हा कार्यक्रम करतो. रसिकांची त्याला उत्स्फूर्त दाद लाभली. तसेच मा. दिनानाथांच्या जन्मशताब्दीवर्षाचे औचित्य साधून त्यांनी गायिलेली त्यांची गाजलेली अशी नाट्यपदे 'स्वरांजली' कार्यक्रमात सादर करतो. 'शिवगौरव' हा शिवाजीमहाराजांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या, त्यांच्या कार्यप्रणालीचे वर्णन करणाऱ्या, तसेच राज्यकर्त्याला आवश्यक असणाऱ्या गुणांचा गौरव करणारा कार्यक्रमही करतो. यातील गीते श्री. ता.ग. लिमये यांची असून संगीत माझ्या वडिलांचे म्हणजे रघुनाथ वझे यांचे आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी याचे कार्यक्रम झाले.

आणखी नवीन काही ? असे विचारताच त्यांनी एक कॅसेट दाखवली. आयोजन संगीत सभेने मल्हार महोत्सव हा कार्यक्रम आयोजित केला होता. यात प्रसिद्ध विनोदी लेखक श्री. वि. आ. बुवा यांचा त्यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त सत्कार करण्यात आला. व त्यांच्याच हस्ते 'गजानन गणराय गजमुख' या कॅसेटचे प्रकाशन करण्यात आले. यातील गीते चंद्रशेखर वझे यांनीच संगीतबद्ध केली आहेत व गायिली आहेत.

स्वत:चा शोध घेत शास्त्रशुद्ध आणि तरीही सुश्राव्य असे तबलावादन आणि गाणं पेश करणारा असा हा गुणी कलावंत- चंद्रशेखर रघुनाथ वझे.

**सौ. मंजिरी दांडेकर**
मधु मिलिंद बंगला,
घंटाळी पथ, नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी : ५४१ ४५३९

*With Best Compliments from*

**Ashok Commercial Enterprises**

911/972, Dalamal Tower,
24/ Nariman Point, Mumbai - 21

Phone : 284 5869 / 70 / 71

# मुलाखतकारांची मुलाखत – एक रंगलेला 'शब्द' सोहळा

सौ. सुचेता मयेकर

*ठाण्यात अलीकडेच झालेल्या एका रंगतदार कार्यक्रमांवर आधारित हा वृत्तलेख. अनेक जण अनेक कार्यक्रमांना हजर राहतात. त्यांनाही असेच वृत्तलेख बनवून पाठविल्यास दिशासाठी विचार केला जाऊ शकतो. - संपादक*

ठाण्यातील इंद्रधनु संस्थेने सरस्वती क्रीडा सभागृहामध्ये मुलाखतकारांची मुलाखत या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नेहमीच्या परिस्थितीपेक्षा उलट्यादिशेने वाहणाऱ्या या संवादाच्या प्रवाहात मराठीतले आघाडीचे निवेदक सहभागी झाले. मंगला खाडिलकर, सुधीर गाडगीळ, प्रदीप भिडे आणि वासंती वर्तक या मुलाखतकारांची मुलाखत प्रसिद्ध कवी प्रा. शंकर वैद्य यांनी घेतली. सुरुवातीला या सर्व मान्यवरांचे स्वागत इंद्रधनुतर्फे करण्यात आले. त्यानंतर शंकर वैद्य यांनी सर्वच मुलाखतकारांची सविस्तर ओळख करून दिली.

कार्यक्रमाच्या निवेदनाची, सूत्रसंचलनाची तयारी कशी करता या पहिल्याच प्रश्नावर चारही मुलाखतकारांनी दिलेल्या उत्तरांवरून हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत जाणार हे सिद्ध झाले. तरुण पिढीला निवेदनक्षेत्राविषयी माहिती व्हावी या हेतूने खरंतर या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे पण तीच मंडळी इथे फार कमी प्रमाणात उपस्थित असल्याची खंत व्यक्त करून या कार्यक्रमाची संकल्पना आखणाऱ्या वासंती वर्तक यांच्या उत्तराने या संवादाला सुरुवात झाली. त्या म्हणाल्या की कोणती संस्था आहे, कशाप्रकारचा कार्यक्रम आहे हे लक्षात घेऊन मग कार्यक्रमाची तयारी करते. मंगला खाडिलकर यांनी निवेदक आणि सूत्रसंचालक या दोन्ही भूमिका वेगळ्या असल्याचे सांगितले की निवेदन करताना निवेदक हा श्रोत्यांचा/रसिकांचा प्रतिनिधी म्हणून व्यासपीठांवर असतो तर सूत्रसंचालन करताना ज्या संस्थेचा कार्यक्रम आहे त्या संस्थेचा प्रतिनिधी व्हावे लागते. असे सांगून त्या पुढे म्हणाल्या की कार्यक्रमाचा अभ्यास हा तेवढ्यापुरताच मर्यादित नसतो. तो प्रवाह बनतो. त्यामुळे सजगपणे भोवतालच्या गोष्टी टिपून घ्याव्या लागतात. हाच मुद्दा पुढे नेत सुधीर गाडगीळ म्हणाले की सातत्याने माहिती गोळा करत रहावी लागते. प्रत्येक भेटणारा माणूस हा तयारीचा भाग असतो. त्यामुळे भेटलेल्या प्रत्येक माणसाशी बोलल्याशिवाय रहात नाही. मिळालेले प्रत्येक पुस्तक वाचल्याशिवाय रहात नाही. उमेदवारीच्या काळात केलेल्या पत्रकारितेचा उल्लेख करून ते म्हणाले की पत्रकारितेमुळे मला संदर्भांचे जे ज्ञान मिळाले त्याकरता मी पत्रकारितेचा ऋणी आहे. मला काही सूत्रसंचालनांची भट्टी जमली नाही असं खुल्या मनाने मान्य करून प्रदीप भिडे म्हणाले की आदल्या दिवसापर्यंत कार्यक्रमाच्या तयारीचा मुहूर्त लागत नाही. मग आदल्या दिवशी धावपळ सुरु होते. अर्थात बरेचवेळा उत्स्फूर्तता कामी येते. उत्स्फूर्ततेचा मुद्दा आल्याबरोबर सुधीर गाडगीळ यांनी एक किस्सा सांगितला. बऱ्याचवर्षांपूर्वी एका कार्यक्रमाला त्यावेळचे उपमुख्यमंत्री यायचे होते. कामाच्या व्यापामुळे पुढच्या कार्यक्रमाला उशीरा जाणे ही त्यांची सवय झाली होती. ही गोष्ट त्यांच्या कट्टर समर्थकांनाही खटकत होती. पण सांगायचे कोणी ? असा प्रश्न होता. या कार्यक्रमालाही ते नेहमीप्रमाणे उशीरा आले. गाडगीळांनी

कार्यक्रम सुरु केला आणि पहिलचं वाक्य ते म्हणाले, सन्माननीय उपमुख्यमंत्री आज त्यांच्या वेळेनुसार वेळेत येत आहेत. योग्य तो 'मेसेज' योग्य ठिकाणी पोहोचला.

मुलाखत रंगायला हळूहळू सुरुवात झाली. स्त्री आणि पुरुष निवेदकांच्या मर्यादा आणि फायदे यावर थोडीशी गरमागरम चर्चा झाली. विनोद योग्य त्या पंचने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणं हे निवेदकांना जितकं जमत तेवढ निवेदिकेला जमत नाही, त्या विनोदात निखळता फार कमी असते. असे मंगला खाडिलकर म्हणाल्या.

नाटकात केलेली कामे, वक्तृत्व आणि घरातले संस्कार याविषयी बोलताना प्रदीप भिडे म्हणाले की, आम्ही ज्या गावात रहायचो तिथे वीज नव्हती. त्यामुळे इतर माध्यमांचे वर्चस्व नव्हते. गावात एक वाचनालय होते आणि त्याची जबाबदारी आमच्याकडे असल्याने अफाट वाचनाची सवय लागली. मराठी भाषेचे पद्धतशीर शिक्षण मिळाले. गावच्या सभोवताली डोंगरांची रांग होती. त्यामुळे डोंगरावर जाऊन कविता पाठ करायचो. मंगेश पाडगावकर, विंदा, शंकर वैद्य यांच्या कविता मोठ्याने म्हणायचो. त्याशिवाय माझ्या वडलांचा आवाज चांगला होता. त्यामुळे आवाजाची निसर्गदत्त देणगी मिळाली. संपूर्ण शाकाहारी राहिलो आणि मद्यपान करत नाही. या सगळ्याचा एकत्रित परिणाम माझ्या आवाजावर झाला.

मंगला खाडिलकर यांनी आपल्या आवाजाचे जाणतेपणाचे श्रेय आईला दिले. तिच्या जाणिवपूर्वक प्रयत्नांमुळे वाचनाची गोडी लागली. अपयश स्वीकारायची मानसिक तयारी करून घेतली. एखाद्या विषयाकडे कसे बघावे, स्नेह कसा जोडावा यासाठी आईने डोळस प्रयत्न केले. लहानपणीच आपले मत व्यक्त करण्यासाठी वाचकांच्या पत्रव्यवहारात पत्र पाठवायची सवय लावली. पुस्तक वाचले की लेखकाला पत्र लिहायचे. शिरीष पै यांना खूप लहानपणी पत्र लिहिले , त्याचे उत्तर ही आले आणि मग त्याचे रूपांतर चांगल्या मैत्रीत झाले. वासंती वर्तक संस्काराविषयी म्हणाल्या की माझ्यावर जाणीवपूर्वक संस्कार झाले नाहीत. पण पूर्वीच्या काळी प्रत्येक घरामध्ये भाषेचे उच्चाराचे संस्कार व्हायचेच. मग माध्यमाच्या मागणीप्रमाणे 'मोल्ड' होता आले.

सुधीर गाडगीळ संस्काराविषयी बोलताना म्हणाले की पुण्यामध्ये असल्याचा खूप फायदा झाला. अनेक उत्तमोत्तम वक्ते तेव्हा ऐकायला मिळाले. उत्तमोत्तम भाषणे कानी पडली. कसं बोलावे आणि कसे बोलू नये याचे शिक्षण आपोआपच मिळत गेले. एकत्र कुटुंबपद्धतीचे संस्कारसुद्धा महत्वाचे आहेत. कथा-कीर्तनाला आजी आजोबांबरोबर जायला मिळायचे. 'लोणविके दामले आळी' असे नामाभिमान धारण करणाऱ्या आळीतच मी रहात असल्याने वैशिष्ट्यपूर्णता ही सगळीकडे दिसत होती. फेरीवाल्यांच्या आवाजाचे नादाचे संस्कार सुद्धा खूप काही शिकवणारे होते. पु.ल. देशपांडेंची नेमकी आणि आगळी शब्दरचना, आपल्याला आधीही माहीत असणाऱ्या गोष्टींची निराळीच ओळख करून देण्याची त्यांची हातोटी याचे नेहमीच अप्रूप वाटायचे. 'आपली आवड' च्या कमलिनी विजयकर यांचा आवाज मला खूप आवडायचा. नीलम प्रभूंचा आवाजही मनात साठून आहे. माझ्या उमेदवारीचा काळ हा योगायोगाचा होता. अत्रे-फडके वाद संपला आणि दोघांची एकत्रित सभा संभाजी पार्कजवळ झाली. ना. सी. फडके बोलायला उभे राहिले आणि पहिल्याच वाक्यात आ. अत्रेंची ओळख करून दिली. ते म्हणाले की गेल्या दहा हजार वर्षात असा कार्यक्रम झाला नाही असे मी म्हणणार नाही कारण दहा हजार वर्षांपूर्वी मी नव्हतो अत्रे नव्हते आणि तुम्हीही नव्हता. मग आ. अत्रे बोलायला उभे राहीले. ते म्हणाले की, ''काय गंमत आहे बघा. आमच्या मुंबईच्या सभेला दत्तो वामन पोतदारांच्या रूपाने 'पुराण पुरुष' उपस्थित होते आणि इथे पुण्यात ना.सी. फडके यांच्या रूपाने 'प्रणय पुरुष' उपस्थित आहेत. काय गंमत आहे बघा !''

असे वक्ते नंतरच्या काळात फार कमी झाले आणि आता तर एकही त्या तोडीचा वक्ता दिसत नाही. असे सुधीर गाडगीळ पुढे म्हणाले.

गप्पांची मैफल अशीच पुढे नेत शंकर वैद्य यांनी पुढचा प्रश्न विचारला. तुमचा गाजलेला किंवा फसलेला कार्यक्रम आणि नाट्यपूर्ण घटना घडली असल्यास तशी घटना सांगा. पुन्हा एकदा सुरुवात वासंती वर्तक यांनी केली. नुकत्याच पार पडलेल्या भव्यदिव्य प्रमाणातील राज्य चित्रपट रजनीच्या वेळी संयोजक, व्यावसायिक बांधिलकी आणि प्रेक्षक यांच्यामध्ये अडकल्यावर कशी फरफट होते याचे उदाहरण सांगितले.

मुंबईत बॉम्बस्फोटांची मालिका झाली. त्या वेळचा एक हृद्य अनुभव सांगताना प्रदीप भिडे म्हणाले की मुंबईकरांच्या आयुष्यावर असलेले भीतीचे सावट गडद आहे याची प्रचिती त्या दिवशी आली. दुसरी घटना म्हणजे राजीव गांधींची हत्या करण्यात आली. ते बुलेटीन मी वाचले. पक्षीय मतभेद बजूला ठेवूनही माझ्या मनावर त्या घटनेचा इतका प्रभाव पडला होता की बुलेटीन वाचताना माझ्या आवाजातून ते स्पष्टपणे जाणवत होते. नंतर कितीतरी दर्शकांनी भेटल्यावर सांगितली की, भिडे, त्यादिवशीचा तुमचा आवाज आमचे काळीज कापत गेला.'

जिवावर बेतलेल्या कार्यक्रमा विषयी मंगला खाडिलकर म्हणाल्या की गाण्याचा वाद्यवृंद होता. समोर सगळी दादा-भाई लोकांची गर्दी होती. प्रत्येक गाणे झाल्यावर चिठ्ठी आणि पैसे यायचे. मी पैसे बाजूला ठेवायचे आणि चिठ्ठी एका बाजूला. थोड्यावेळाने संयोजकांनी विनंती केली की इथल्या प्रथेनुसार पैसे आणि नाव जाहीर करावे. मी त्यांना म्हटलं की कार्यक्रमाच्या रंगाचा बेरंग होणार नाही अशा बेताने ती नांवे वाचीन. मग त्या चिठ्ठ्या वाचल्या. पण त्या वाचताना ज्या क्रमाने त्या आल्या तो क्रम नव्हता. कार्यक्रम संपला आणि मी आम्हाला दिलेल्या खोलीत जाऊन बसले. एक क्षण जात नाही तोच एक दारु पिउन तर्र झालेला तरुण हातात चाकू घेऊन तिथे आला आणि म्हणाला आमच्या दादाचे नाव पहिल्यांदा का नाही घेतले. बाईमाणूस म्हणून सोडून देतो बाप्याअसता तर...! मी त्याला कांही सांगण्याचा प्रयत्न करत असतानाच इतर कलाकार आणि संयोजक आले आणि त्यांनी त्याला बाहेर नेले. आम्ही सर्वचजण तेथून तावडतोब निघालो.

सुधीर गाडगीळ म्हणाले की, 'मंतरलेल्या चैत्रबनात' चा प्रयोग नाशिकजवळ कुठल्याश्या गावी होता. पडदा उघडला आणि समोर चिटपाखरु सुद्धा नव्हते. मग कॉन्ट्रॅक्टरने दहा-पंधरा बायकांना आणून बसवले. पण त्यांना जुन्या गाण्यात काही रस नव्हता. नेमका टीव्हीवर अमिताभ बच्चनचा 'दिवार' सुरु होता. आम्ही नियमाप्रमाणे सुरुवात केली. माझ पहिल वाक्य झाले आणि समोरची एक बाई उठून म्हणाली, 'ए, बडबड्या गाणं म्हणं की!' पुढचा कार्यक्रम पंधरा मिनिटात सपशेल पडला.

निवेदन, सूत्रसंचालन करीत असतानाच विविध उपक्रमांमध्ये स्वतःला गुंतवून घेणाऱ्या या मुलाखतकारांनी आपल्या उपक्रमांविषयी सांगितले. सौंदर्यस्पर्धांना विरोध का केलात ? असं विचारल्यावर वासंती वर्तक म्हणाल्या की, एका शाळेच्या बक्षिस वितरणाला मी गेले होते. फार मोठा कार्यक्रम नव्हता, गॅदरिंग नव्हते. तरी देखील दोन मुली मस्कारा लावून आल्या होत्या ही गोष्ट मला खटकली. आणि त्यातूनच या सौंदर्यस्पर्धांना विरोध करावासा वाटला. म्हणून मग मी स्वतः काही वर्ष विविध स्पर्धा आयोजित केल्या. त्या स्पर्धांमध्ये तुम्ही व्यासपीठावर येता कसे, कसे उभे रहाता, बोलता कसे यावर भर दिला होता.

'आरसा' या एकपात्री कार्यक्रमाविषयी सांगताना मंगला खाडिलकर म्हणाल्या की बृहन महाराष्ट्र मंडळाला कथा, कविता, किस्से यांचा १ १/२ तासांचा कार्यक्रम हवा होता. मी विवेक साप्ताहिकात 'आरसा' नावाने सदर

लेखन करतच होते. शिवाय निवेदनाचे अनेक प्रकार हाताळल्याने अनुभव होता. अनेक किस्से जवळ होते. त्यातूनच 'आरसा' तयार झाला. निवेदक हा सुद्धा काहीतरी विचार देऊ शकतो. हा विश्वास मला होता. तसंच प्रत्येक निवेदकाने आपले बलस्थाने आणि मर्यादा ओळखल्या की त्याची शैली बनत जाते. हे लक्षात घ्यायला हवं असही त्या म्हणाल्या. सुधीर गाडगीळ यांनी आपल्या पुस्तकांविषयी सांगितले. ते म्हणाले 'लाईफ स्टाईल' मध्ये मी नामवंत व्यक्तींच्या मुलाखती आणि जीवनशैली दिल्या. पण 'मुद्रा' मध्ये मात्र मला वेळोवेळी भेटलेल्या, जाणवलेल्या सर्व सामान्य माणसांविषयी लिहिलं. थोडक्यात काय तर 'माणूस' या गोष्टीविषयी निवेदकाला प्रेम असायला हवं. आत्मीयता हवी. बोलणारी माणसे मोकळी झाली आहेत. ऐकणारी माणसे ऐकण्यास तयार आहेत अशा परिस्थितीत पद्धतशीरपणे सभ्यतापूर्वक खुली चर्चा व्हायलाच हवी.

केवळ या व्यवसायावर मनुष्य तग धरु शकतो का? या शेवटच्या प्रश्नाकडे मुलाखत आली. खिलाडूवृत्तीने सुरु असणारी केवळ मैफल रंगतदार व्हावी म्हणून होत असलेली टोमणेबाजी, शेरेबाजी संपून मैफलीची सांगता योग्य रितीने होणार असा संकेत त्याच वेळी मिळाला. प्रदीप भिडे म्हणाले की केवळ कार्यक्रम करुन आयुष्याची उपजिविका करणे शक्य आहे. अर्थात तेवढा वकुब असेल तर. असंख्य माणस भेटतात, त्यांच्या माध्यमातून अर्थार्जनाच्या विविध संधी निर्माण होतात. जाहिरातीचे क्षेत्र, डॉक्युमेंटरी आणि एकूणच व्हॉईसिंगच्या क्षेत्रात खूप संधी उपलब्ध आहेत. वासंती वर्तक म्हणाल्या केवळ आलेले कार्यक्रम करायचे म्हटले तर तग धरता येणार नाही. स्वत:हून वेगवेगळ्या संकल्पना निर्माण कराव्या लागतात. मंगला खाडिलकर म्हणाल्या की, आकाशवाणीची नोकरी सोडून आता २१ वर्षे झाली. मी पूर्ण स्वावलंबी आहे. पतीच्या खांद्यांला खांदा लावून कार्यक्रमाद्वारे पैसे मिळवू शकले. अनेक वाटा या निमित्ताने चोखाळायला मिळाल्या. याच अनुषंगाने मी एक पुस्तक लिहीत आहे. त्यामध्ये अनुभवांचे सार असेल.

सुधीर गाडगीळ यांनी या मैफलीची सांगता आपल्या उत्तराने केली. ते म्हणाले. हाच व्यवसाय करुन उत्तम जगता येतं. यावरच मुलाने आर्किटेक्चर आणि मुलीने कॉलेजचे शिक्षण पूर्ण केलं. अर्थात या बरोबर अनेक पूरक गोष्टी करता येतात. खूप माणसं जोडता आली. 'इंप्रेशन' या संस्थेद्वारे कंपन्याना वर्षभराचे सांस्कृतिक कार्यक्रम आखून दिले जातात. टेबलावर ठेवावयाच्या गोष्टींपासून ते कलाकाराला बोलवण्यापर्यंत सगळ्या सेवा ही संस्था देते. याशिवाय 'कल्चरल कंन्सलटन्सी ' सुरु केली. विविध उद्योजकांकडे जायचं त्यांच्याशी तासभर (त्याचाच चहा पीत) गप्पा मारायच्या, नवीन पुस्तक, नाटक, चित्रपट, इतर सांस्कृतिक घडामोडींविषयी अप टू डेट माहिती त्यांना द्यायची या करता भरपूर मानधनही मिळते. वरकरणी अतिशय गंमीतीची वाटणारी ही योजना कितीतरी पटीने फायदेशीर आहे.

नवीन निवेदकांना या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शनासाठी 'शब्द' या त्यांच्या ट्रस्ट तर्फे १५ ऑक्टोबरपासून कार्यशाळा घेतल्या जाणार आहेत. या घोषणेने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**सौ. सुचेता मयेकर**

२१०, स्मृती, विष्णुनगर,
बाजी प्रभू देशपांडे मार्ग, ठाणे ४०० ६०२

•••

# फिजीतील भारतीय वांशिकांवरील संकट

*फिजीतील वांशिक संकटाबाबत गेले काही दिवस सातत्याने बरेच काही चिंतन सुरु आहे. या संदर्भातील एका आगामी ग्रंथातील लेख येथे देत आहे. - संपादक*

## फिजीचा भूगोल

फिजी हा देश म्हणजे प्रशांत महासागरातील विषुववृत्ताजवळील तीनशे बेटांचा द्वीपसमुह आहे. या देशाचे एकूण क्षेत्रफळ १८, ३७६ चौ.कि.मी. असून यापैकी अर्धा भूभाग एकाच बेटाने व्यापला आहे. सुवा ही या देशाची राजधानी.

## राजकीय इतिहास

१८७४ साली हा भूभाग ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आला. १८७९ साली ब्रिटीशांनी उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांना त्यांच्या परिवारासह या बेटांवरील उसाच्या मळ्यात काम करण्यासाठी नेले. त्या काळात आसपासच्या ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आदि भूभागांवरही ब्रिटीशांचीच सत्ता होती. १९७० साली ब्रिटीशांच्या ताब्यातून फिजी मुक्त झाला. या देशात ब्रिटीशांची सत्ता ९६ वर्षे होती. १९७० साली या देशात असलेले सर्व जण या देशाचे नागरिक झाले. त्यानंतर देशाची घटना बनविण्यात आली व राज्यकारभार सुरू झाला. स्वातंत्र्यापासूनच फिजी वंशीय व भारतीय वंशीय यांच्यातील संघर्षाने कमी-अधिक पेट घेतला होता. १९८७ मध्ये सितिवेनी राबुका यांनी केलेल्या कटात लोकनियुक्त सरकार पडले. राबुका यांनी केलेल्या सत्तापालटानंतर तयार करण्यात आलेल्या घटनेमध्ये भारतीयांना दुय्यम नागरिकत्व देण्यात आले. त्यांच्या हक्कावर मर्यादा घालण्यात आल्या. महत्त्वाची पदे भारतीय वंशीयांना नाकारण्यात आली. राष्ट्रकुल राष्ट्रांनी याचा निषेध केला. त्यांच्या दबावाखाली पुन्हा घटना बदलण्यात आली. या घटनेनुसार ७१ सदस्यीय संसदेमध्ये फिजी वंशीयांसाठी २३ जागा, भारतीय वंशीयांसाठी १९ जागा, तर इतरांसाठी ४ जागा राखीव ठेवण्यात आल्या. २५ जागा सर्वांसाठी खुल्या ठेवण्यात आल्या. या घटनेनुसार घेण्यात आलेल्या निवडणुकांच्या आधारेच सध्याचे महेंद्र चौधरी मंत्रिमंडळात सत्तेवर आले होते. बंडखोर फिजी वंशीयांनी श्री. चौधरी यांना पदच्युत करण्याचे लोकशाहीविरोधी कृत्य केले आहे.

## वंश व पंथ यांनुसार लोकसंख्या

फिजी स्वतंत्र झाल्यावर तेथील ५१ टक्के लोक भारतीय वंशाचे होते. मध्यंतरी झालेला वांशिक उठाव, तसेच अधूनमधून भारतीय वंशीयाविरुद्ध होणाऱ्या कारवाया यांमुळे अनेक भारतीयांनी हा देश सोडला. (चीनने तिबेटमधील चिनी जनतेचे प्रमाण पद्धतशीरपणे वाढविले. याउलट भारताने फिजीमधील भारतीयांचे प्रमाण कमी होऊ दिले.) यामुळे सद्यस्थितीला देशात ४३ टक्के लोक भारतीय वंशाचे, तर तितकेच मूळ फिजी वांशिक आहेत. उर्वरित १४ टक्के लोक अन्य वंशाचे आहेत. यातील थोडेफार ब्रिटिश वांशिकही आहेत.

फिजीतील भारतीय वंशाच्या लोकांची एकूण संख्या चार लाख आहे. ४३ टक्के भारतीय वांशिकांपैकी ३५ टक्के हिंदू, ७ टक्के मुसलमान व एक टक्का शीख आहेत.

**फिजींतील भारतीयांचे प्रभुत्व**

फिजींमधील भारतीयांचे, विशेषतः हिंदूंचे व हिंदु संस्कृतीचे विशेष प्रभुत्व आहे. या देशातील हिंदुधर्मीयांनी आपली संस्कृति जपली आहे. या बेटावर श्रीरामाचे एक व अन्य दोन मोठी मंदिरे आहेत. हिंदुप्रमाणे ख्रिस्तीधर्मीयसुद्धा या देवळात जातात. येथील संगीतावर भारतीय शास्त्रीय संगीताचा मोठा पगडा आहे. येथील दुकानात भारतीय वाद्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. येथील मुसलमान स्त्रिया हिंदु स्त्रियांप्रमाणेच साडी नेसतात. तसेच या देशातील शेती, कारखानदारी व व्यापार यांवर भारतीयांचे प्रभुत्व आहे. मात्र देशातील लष्कर व पोलीस यांमध्ये फिजी वांशिकांचाच भरणा आहे.

**ख्रिस्ती धर्मोपदेशक व अमेरिका यांची हिंदुविरोधी नीति.**

ब्रिटीशांनी देश सोडून जातांना फिजीतील जमिनी अधिक तर ख्रिस्तींच्याच ताब्यात जातील अशी नीति आचरली. शेती हाच येथील अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने त्यावरही स्थानिक ख्रिस्तींचेच प्रभुत्व आल्यास धर्मप्रसारासाठी भरपूर पैसा मिळेल, या हेतूने ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी स्थानिकांना भारतीय वंशाच्या लोकाविरूद्ध भडकविण्याचे प्रकार केले. जमिनी स्थानिकांच्या ताब्यात असल्या, तरी उत्पन्न घेण्याची पुढील प्रक्रिया भारतीयांच्या ताब्यात आहे. हिंदुंचे प्राबल्य राहिले, तर त्यांची संख्या आणखी वाढेल व त्यांचे प्रभुत्व कायमचे होईल, अशी भीति इतरांना वाटते.

फिजीमधील भारतीय वांशिकांच्या प्रचंड संख्येमुळे तेथील राजकारणातील भारतीयांचे वर्चस्व अमेरिकेला खटकत आहे. सुमारे दीड दशकापूर्वी अमेरिकेला प्रशांत महासागरात अणुचाचण्या करावयाच्या होत्या. सी.आय.ए. (सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी) या अमेरिकेच्या गुप्तहेर संघटनेने फिजी बेटावरील भारतीयांकडे असलेली सत्ता काढून घेण्यासाठी उठाव घडवून आणला. या संघटनेच्या मदतीने त्या वेळी सितिवेनी राबुका यांनी भारतीय वंशाच्या पंतप्रधानाचे सरकार उलथून टाकले होते.

**बंडखोरांचा नेता जॉर्ज स्पेट**

१९ मे २००० रोजी भारतीय वंशाच्या महेंद्र चौधरी यांचे सरकार उलथून टाकणाऱ्या बंडखोरांचा जॉर्ज स्पेट हा नेता आहे. स्पेट याचा जीवन इतिहास समजून घेतल्यानंतर सध्याच्या संघर्षामागील मूळ कारण स्पष्ट व्हायला मदत होईल.

१. **मूळ युरोपीय वंशाचा स्पेट :**

जॉर्ज स्पेट याचे आजोबा न्यूझीलंडमधून फिजीत आल्यानंतर त्यांनी तेथील स्थानिक महिलेशी लग्न केले. मूळ भारतीय वंशाच्या लोकांना 'बाहेरचे' म्हणून विरोध करणारा हा बंडखोर नेता स्वतः मात्र मूळ युरोपीय वंशाचा आहे.

२. **ऑस्ट्रेलियात स्थायिक असलेला नेता :**

स्पेटचे पदवीपर्यंत शिक्षण ऑस्ट्रेलियात झालेले आहे. तेथेच त्याने एका गौरवर्णीय महिलेशी विवाह केला. १९९० मध्ये तो आपल्या दोन मुलांसह सपत्नीक ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथे स्थायिक झाला. तेथून तो फक्त दोन वर्षांपूर्वीच फिजीत आला. त्याची मुले व पत्नी अद्यापही ऑस्ट्रेलियात आहेत. बंडखोरीनंतर त्याने आपल्या ऑस्ट्रेलियन प्रवेशपरवान्याचे नूतनीकरण करून घेतले आहे. यावरून मायदेशाविषयी या व्यक्तीला ओढ किती आहे, ते समजावे. स्पेट याने अशी बंडखोरी केल्याने त्याची पत्नी, नजीकचे परिचित व जवळचे भारतीय वंशाचे परिचित यांना धक्काच बसला. कारण स्थानिक फिजी व भारतीय या दोन मुख्य वंशांतील रहिवाशांत सामंजस्य वाढविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या एका संघटनेचा सरचिटणीस या नात्याने काही काळापूर्वी उत्तम कार्य केले होते.

### फसवणुकीबद्दल कुप्रसिद्ध :

ऑस्ट्रेलियात 'वॉट स्कीम' या नावाने एक गुंतवणूक योजना चालू करणाऱ्या प्रवर्तकांपैकी जॉर्ज स्पेट एक आहे. या योजनेत गुंतवणूक करणाऱ्या तीन हजार गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप या प्रवर्तकांवर आहे. आपले भांडे फुटल्यानंतर स्पेट ऑस्ट्रेलियातून पलायन करून फिजीत आला. फिजीमध्ये त्याने 'हीथ लिमिटेड' या कंपनीत मुख्य अधिकारी म्हणून काम सुरू केले. फसवणुकीच्या आरोपातून या कंपनीनेही त्याची हाकलपट्टी केली. याचे वडील आधीच्या राबुका सरकारमध्ये मोठ्या अधिकारपदावर होते. स्पेटने पुढे सरकारी दलाल म्हणून व्यवसाय सुरू केला. त्यानी फिजीतील गुजराथी व्यावसायिकांना धमकावून पैसा गोळा करण्याचे तंत्र जोपासले. चौधरी मंत्रिमंडळाने त्याला लाकूड महामंडळाचे अध्यक्षपद दिले होते. तेथे त्याने प्रचंड भ्रष्टाचार केला. त्याविरुद्ध पंतप्रधान चौधरी यांनी कारवाई करण्याचे विचार व्यक्त करताच त्याने भारतीय वंशाचे लोक फिजीचे शोषण करीत असल्याचा कांगावा केला. त्याला महामंडळाच्या अध्यक्षपदावरून दूर करताच त्याने भाडोत्री सैनिकांच्या मदतीने पंतप्रधान व त्यांचे सहकारी यांना ओलीस धरले.

### ४. स्पेटच्या बंडखोरीमागे व्यक्तिगत हेवेदावे :

गेल्या वर्षी महेंद्र चौधरी मंत्रिमंडळात सत्तेवर आल्यावर स्पेटच्या उद्योगांना चाप लावला गेला होता. ज्या तीन सरकारी बडतर्फ कंपन्यांवर तो प्रमुख म्हणून काम करीत होता, त्या पदांवरून त्याला बडतर्फ करण्यात आले. त्यामुळे स्पेटच्या बंडखोरीला वरकरणी वंशवादाचा मुलामा देण्यात आलेला असला तरी वास्तवात संघर्षाचे मूळ हे व्यक्तिगत हेव्यादाव्यातच आहे.

### भारताचा घातक नाकर्तेपणा

सुमारे शतकापूर्वी देश सोडून गेलेल्या भारतीयांनी परिश्रम व बुद्धि यांच्या जोरावर अन्य देशात आपले प्रभुत्व निर्माण केल्याचे फिजी हे एकमेव उदाहरण नव्हे. हिंदी महासागरातील मॉरिशस बेटांचीही हीच स्थिती आहे. तेथे मूळ भारतीय वंशाचेच पंतप्रधान आहेत. तेथे अनेक वंशाचे लोक राहतात. परंतु वांशिक संघर्ष नाही. याउलट परिस्थिती फिजीमध्ये आहे. फिजीमध्ये स्थानिकांनी लोकशाही धाब्यावर बसवून भारतीय वंशाच्या सत्ताधिशांना हाकलण्याचे सत्र आरंभिले आहे. याची लागण मॉरिशससारख्या ठिकाणीही लागण्याची शक्यता आहे. भारताने फिजीतील घडामोडींची पुरेशी दखल घेतली नाही. भारतीय वंशालाच कारण धरून त्यांच्यावर अन्याय होत असताना, त्यांच्या दुकानांची लुटालूट होत असताना, चार लाख भारतीय असणाऱ्या या देशातील घडामोडींचे निरीक्षण करण्यासाठी एकाही भारतीय वृत्तपत्राने व वृत्तसंस्थेने आपला पत्रकार पाठविला नाही वा त्याविरुद्ध आवाज उठवला नाही. भारत सरकारने या देशात आपला प्रतिनिधी पाठविण्यासाठी दोन आठवड्यांहूनही अधिक काळ घेतला ! यावरून भारतीय वंशाच्या रक्षणासाठी भारतीयांना किती आपुलकी व पोटतिडीक आहे, हे लक्षात यावे.

परदेशात जाणाऱ्या भारतीयांनी तेथे स्वकष्टाने, हिमतीने काही मिळविले की, त्यांनी ते मातृभूमीसाठी पाठवावे, अशी सरकार अपेक्षा ठेवते. मात्र हेच परदेशस्थ भारतीय संकटात पडले की, त्यांच्यासाठी सरकार, वृत्तपत्रे, जनता उदासीन रहातात. अशाने देश समृद्धीकडे कसा जाईल? परदेशस्थ भारतीयांच्या हिताचे रक्षण हा आपल्या राज्यकर्त्यांच्या कर्तव्याचा एक भाग मानला जायला हवा.

*(सनातन संस्थेतर्फे प्रकाशित होणाऱ्या संरक्षणविषयक ग्रंथ मालिकेतील 'खंड ३ ए' भारताची युद्धसज्जता या आगामी ग्रंथातून)*

• • •

# अग्रक्रम....

श्री. अशोक करंदीकर

*धावपळत गाडी गाठणं हे एक दिव्यच असतं. या दिव्यातून मुंबईकर रोजच पार पडतात. तरीही गाडी चुकल्याचा अनुभव येतोच ! असाच एक ललित वेध. - संपादक*

आमचं कुटुंब हे आदर्श लोकशाहीचं एक उत्तम उदाहरण आहे. प्रत्येक व्यक्तीला आमच्या कुटुंबात सर्व प्रकारचं स्वातंत्र्य आहे. उदाहरणानेच स्पष्ट करायचं झालं तर एखाद्याला पंखा लावावासा वाटला तर तो पंखा लावतो आणि दुसऱ्या कोणाला बंद करावासा वाटला तर बंद करतो. जे पंख्याच्या बाबतीत तेच टी.व्ही. किंवा इतर उपकरणांच्या बाबतीत. म्हणजेच जिवंत प्राणी जसा श्वासोच्छ्वास करीत असतो तशीच आमच्या घरात विविध प्रकारच्या उपकरणांची उघडझाप सतत चालू असते. अधूनमधून 'मराविम' चाही या लपंडावात सिंहाचा वाटा असतो. परिणामी मोडतोड जास्त. ह्या मोडतोड झालेल्या उपकरणांची दुरूस्ती करणे ही माझी नैतिक जबाबदारी असल्याने ती मला पार पाडावीच लागते. नाहीतर निदर्शन, घेरावा, टीका या अप्रिय गोष्टींना सामोरं जावं लागतं.

घराच्या भिंतींना कोणता रंग द्यायचा याबद्दल प्रत्येकाचं मत वेगळं आणि ठाम असतं. यालाच म्हणतात वयात आलेली लोकशाही ! आणि प्रत्येकाच्या मनाची कदर व्हावी व कोणालाही दुखावलं जाऊ नये अशी लोकशाहीची मूलभूत कल्पना असल्याने आमच्या घराच्या भिंती रंगीबेरंगी आहेत. कोणी केव्हा घरी यायचं, केव्हा जायचं, केव्हा काम सुरू करायचं किंवा बंद करायचं किंवा कोणत्या कामाला प्राधान्य द्यायचं अशा सर्व बाबतीत आमच्याकडे पूर्ण स्वातंत्र्य आहे. परिणामी ठरलेल्या वेळी ठरलेल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या जातीलच याची शाश्वती कोणीच देऊ शकत नाही. हे लोकशाहीचे एक अवच्छेदक लक्षण आमच्या कुटुंबातही वारंवार अनुभवास येतं. आता परवाचंच बघाना. मला कार्यालयात जायची घाई होती. त्याच दिवशी पासाचे नूतनीकरण करायचे होते म्हणजे घरून नेहमीपेक्षा पांच-दहा मिनिटे लवकर निघणे आवश्यक होते. स्नान करून बाहेर आलो तेव्हा बायको नुकतीच उठलेली होती. कारण आदल्या दिवशी भारत विरुद्ध पाक हा प्रकाशझोतातील सामना कधी नव्हे तो फारच रंगला. त्यामुळं झोपायला उशीर झालेला, लोकशाही म्हणजे काय हे कळलं नाही तरी देखील आपल्याला लोकशाही हवी असते तसचं क्रिकेटचं. क्रिकेटमधील विशेष काहीही माहिती नसली तरी आपल्याला क्रिकेटची मॅच बघायला आवडते. त्यात भारत-पाकिस्तान सामना असेल तर मग विचारायलाच नको.

अर्थात बायको झोपेतून उठली म्हणून ऑफिसला जाण्यापूर्वी चहा मिळेल अशी शक्यता नव्हतीच. कारण सकाळी उठल्यावर अगदी मुखमार्जन करण्यापूर्वी देखील तीन-चार मिनिटे अंथरूणात बसल्या, बसल्या देवाचे नाव घेण तिच्या दृष्टीने महत्त्वाचं असतं. त्यानंतर किचनमध्ये शिरल्या शिरल्या तेथे असलेल्या देव-देवतांची व चक्क गॅसच्या शेगडीची मनोभावे प्रार्थना केली जाते. हे सर्व कुटुंबाच्या सुखासाठी ती करते.

प्रार्थना संपल्यावर मग ब्रश करणं आणि मग माझ्या चहाचा विचार ! थोडक्यात त्या दिवशी तरी वेळेवर चहा मिळण्याचे योग माझ्या पत्रिकेत नसावेत. अर्थात चहा न मिळण्याचे योग वारंवार माझ्या पत्रिकेत असल्याने त्याची मला आता सवय झाली आहे. पण चहाचा एक कप घेतल्याशिवाय कामाला सुरुवात करणं मला जमत नाही. म्हणून ऑफिसला जाता जाता एखाद्या उपहारगृहात चहा घेऊनच मग मी पुढे जातो. त्या दिवशी जरा लवकरच बाहेर पडल्यामुळे माझ्या ठरलेल्या दोन उपाहारगृहाची दारं अजून

---

उघडायची होती. रिक्षा करून प्रथम स्टेशनवर गेलो. सुदैवाने स्टेशनच्या परिसरातील काही उपहारगृहे उघडी दिसली. त्यातील बऱ्यापैकी दिसणाऱ्या उपहारगृहात मी शिरलो. एका नजरेत उपहारगृहाची स्वच्छता, टापटीप व माफक डामडौल हे सारं टिपल्यावर तेथे मिळणाऱ्या चहामुळे माझी निराशा होणार नाही अशी खात्री वाटली. सकाळची लवकरची वेळ असल्याने माझ्याखेरीज दुसरं गिऱ्हाईक मला उपहारगृहात दिसलं नाही. मालकाचाही गल्ल्यावरचा पत्ता नव्हता. आत गेल्या गेल्या एकुलत्या एका वेटरने मोठ्या अदबीनं माझं स्वागतं केल. कोणी काहीही म्हणो, एका विशिष्ट वयानंतर पुरुषाच्या खाण्यापिण्याची हेळसांड होते आणि म्हणूनच की काय बहुतांशी पुरुष हॉटेलमध्ये जातात. अगदी न चालणारी किंवा खास करून मराठी माणसाने चालवलेली उपाहगृहे वगळता बाकी सर्व ठिकाणी ज्या अदबीनं आणि आपुलकीने हे वेटर्स आपल्याशी वागतात ते अनुभवले म्हणजे त्यांना दिलेली टिपची रक्कम फारच मामुली वाटायला लागते.

''बैठीये साहब.''

''चाय मिलेगी ?''

'सबकुछ तैयार है साब'' त्याच्या या माहितीमुळे दुधात साखर पडल्यासारखं वाटलं.

मग मी म्हटलं,

'' पहले एक प्लेट इडली लाना. बाद में चाय !''

'' जी साब!''

'' जरा जल्दी करना!'' मी म्हटलं

'' जी साब!''

तीन एक मिनिटांनी तो परतला, पण त्याच्या हातात काहीच दिसलं नाही म्हणून मी थोडा अस्वस्थ झालो.

'' देखो, इडली तैयार नहीं तो सिर्फ चाय लाना!'' मी म्हटलं

'' नही नही सब तैयार है । आपकी ऑर्डर भी दे दी है । लेकिन आपकी इजाजत हो तो ...'' असं म्हणत तो काऊंटरकडे गेला. त्या काऊंटरवरच्या वरच्या भागात सर्व ठिकाणी असतो तसा एक देव्हारा होता. तो वेटर चक्क त्या काऊंटरवर चढला आणि निर्विकारपणे त्यानं देवाला फुल वाहिली व निरांजन लावलं आणि नंतर उदबत्त्या पेटवून त्याचा धूर सर्व कोपऱ्यातून व गल्ल्यातून फिरवून आणला. हे सर्व झाल्यावर तो परत भटारखान्याकडे वळला.

जाता जाता त्याच्या तोंडावर पसरलेलं मधाळ हास्य आणि अजीजीचा भाव यामुळे मला त्याने पुढे काही बोलूच दिले नाही. माझी चुळबुळ कळून न कळल्यासारखी करून तो एकदोन मिनिटातच परतला. पण त्याच्या हातात इडलीची प्लेट नव्हती. तरीही मला जरा दिलासा मिळाला. कारण त्याच्या हातात एक पाण्याचा आणि चहाचा कप पाहिल्यावर मनात म्हटलं 'समथिंग इज बेटर दॅन नथिंग' पण आपल्या नशिबी 'समथिंग' ही नाही हे कळायला फार वेळ थांबावं लागलं नाही. तो वेटर पाण्याचा ग्लास व चहाचा कप घेऊन थेट रस्त्यावर गेला आणि प्रथम पाण्याचा व नंतर चहाचा प्याला रस्त्यावर रिता करून तो परत फिरला.

मला त्यापुढं एक क्षणभरही थांबणं शक्य नव्हतं. पण अगोदर ऑर्डर देऊन बसल्यामुळे ती कॅन्सल करणं अशक्य होतं. तसं मेनू कार्डावर ठळक अक्षरात लिहिलेलं असतचं. त्यातून 'भोवनीचा टाईम' असल्यामुळे तर नाहीच नाही. पुढील सर्व कटु प्रसंग किंवा कटु संवाद टाळण्यासाठी टेबलावर दहाची नोट ठेवून मी काढता पाय घेतला. लोकशाहीत प्रत्येकाला आपल्या चांगुलपणाची किंमत मोजायला लागते.

पासाचे नूतनीकरण म्हणजे रांगेत उभं राहाणं आलंच आणि थोडासा वेळ मोडणार आणि मग ७.१९ ची लोकल मिळणार नाही. मग लेट मार्क. या सगळ्या विचारांमुळे

माझी पावलं झपझप पडत होती. थोड्याच वेळात स्टेशनवर आलो. पासासाठी जेव्हा खिडकी गाठली तेव्हा मला एक आश्चर्यकारक पण तेवढाच सुखद धक्का बसला. फर्स्ट क्लासच्या रांगेत माझ्याशिवाय दुसरा कोणीही प्रवासी नव्हता. म्हणजे पैसे द्यायचे आणि लगेच पास घ्यायचा. सकाळी सकाळी सुट्या पैशांची कटकट नको म्हणून मी योग्य त्या रकमेच्या नोटा घेऊनच बाहेर पडलो होतो. खिडकी पलीकडे डोकावलं, तेव्हां एक पाठमोरी व्यक्ती दिसली ती बुकिंग क्लार्क असणार असं समजून तिचं लक्ष वेधून घेण्यासाठी मी तिकीट काऊंटरच्या खिडकीवर टक टक केलं. त्यानेही कामाचा नुकताच चार्ज घेतलेला असावा. माझ्याकडे पाहून तो म्हणाला,'' जरा एक दोन मिनिटं थांबांव लागेल....'' आणि माझ्या प्रतिक्रियेची दखलही न घेता तोही त्याच्या महत्त्वाच्या कामाला लागला.

प्रथम एका फुलपुडीतून त्यानं दोन हार काढले व ते भिंतीवर टांगलेल्या देवाच्या तसबिरींना घातले. मग उदबत्त्या पेटवल्या व कानाकोपऱ्यांतून फिरवून आणल्या. एक नारळ फोडला. मग हात जोडून एक दोन मिनिटे प्रार्थना झाली. रेल्वे सेवा सुरळीत चालावी व प्रवाशांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये हीच प्रार्थना तो करीत असावा. हे सर्व होईपर्यंत माझ्या मागे सात-आठ प्रवासी उभे राहिल्याचं लक्षात आलं. माझी व त्या प्रवाशांची चुळबूळ आणि अस्वस्थता याची दखल घेण्याची त्या सरकारी कर्मचाऱ्याला काहीच गरज नव्हती. कारण नाहीतरी लोकशाहीत अशा सामान्य गैरसोयींची दखल घ्यायची नसतेच आणि गंभीर समस्यांची दखल त्यामधील गुंतागुंतीमुळे घेणं शक्य नसतं. थोडक्यात लोकशाहीत नागरिकांना हळूहळू समस्यांची सवय लावली जाते. तो क्लार्क परत खिडकीजवळ येईपर्यंत आम्हाला थांबण्याशिवाय पर्याय नव्हताच. मी पासाचे पैसे द्यायला खिडकीतून आत हात पुढे केल्यावर खोबऱ्याच्या तुकड्यांनी भरलेली वशी त्याने माझ्याकडे सरकावली. नारळ, उदबत्त्या, हार हे सर्व स्वतःच्या पैशातून की रेल्वेच्या तिजोरीतून खरेदी केलं हे विचारण्याची समयसूचकता आणि धारिष्ट्य सामान्य नागरिकाकडे नसतचं आणि ते असलं तरी हुज्जत घालायला नागरिकांकडे वेळही असत नाही.

पासाचं नूतनीकरण झाल्यावर मी धावतधावतच प्लॅटफॉर्मवर पोहोचलो आणि माझ्या डोळ्यांदेखत थोडीशी लेट झालली ७.१९ मला प्लॅटफॉर्मवर तिष्ठत ठेवत धाडधाड निघून गेली. पुढची लोकल येईपर्यंत मिळालेला फुरसतीच्या वेळात मलाही आता काहीतरी प्रार्थना करावी असं वाटू लागलं व मी डोळे मिटून प्रार्थना केली की सार्वजनिक कार्यक्षमतोला लागलेलं ग्रहण एकदाचं सुटावं. !

**श्री. अशोक कांदीकर**

२, शिवतीर्थ, कोपरी रोड, नौपाडा ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४०४६६८

•••

*With Best Compliments From*

**S.V. Bhogle**

New Thana Co-op.
Housing Society, Bhaskar Colony
Naupada, Thane (w)

# पर्यावरणासाठी आपण काय करू शकतो.

१) पर्यावरणाविषयक माहिती प्राप्त करू शकतो. त्या आधारे पर्यावरण संरक्षण चळवळीत खारीचा वाटा उचलू शकतो.

२) प्लास्टिकच्या पिशव्या वापरणे पूर्णतया बंद करून कापडी पिशव्या वापरू शकतो.

३) शीतपेयांचे कॅन्स वापरण्याऐवजी पुन्हा वापरता येतील अशा बाटल्या वापरू शकतो.

४) कागदाचा वापर कमीत कमी करू शकतो. जुन्या दिनदर्शिका, जुन्या रजिस्टर वह्यांतील एकच बाजू वापरले गेलेले कागद कच्च्या कामासाठी वापरू शकतो.

५) कचरा कमीत कमी करण्याचे व्रत घेऊन ते पाळू शकतो. सागरकिनारे, सहलीची ठिकाणे, सार्वजनिक ठिकाणे या ठिकाणी कचरा न करून स्वच्छता राखण्यास हातभार लावू शकतो.

६) थुंकणे ही स्वतःच्या व इतरांच्या आरोग्यास घातक असणारी सवय आहे. कोठेही थुंकणे, पान तंबाखूच्या पिचकाऱ्या टाकणे आपण टाळू शकतो.

७) लहानसहान समारंभात पुष्पगुच्छांचा अतिवापर होतो. फुलांची जागा झाडांवर असते हे जाणून आपण पाने फुले तोडणे टाळू शकतो. भावना व्यक्त करण्यासाठी फुलांचा बळी देण्यापेक्षा एखादा रुमाल, एखादी भेटवस्तू देऊनही त्या व्यक्त करता येतात.

८) शुभेच्छा पत्र देण्याची फॅशन आपण आपल्यापुरती शुभेच्छा पत्रांचा वापर टाळून थोपवू शकतो. कारण लहान सहान प्रसंगी असा शुभेच्छा पत्रांचा वापर म्हणजे कागदाचा गैरवापरच आहे.

९) परिसरातील वातावरण प्रदूषित होणारी कोणतीही लहानसहान कृती माझ्याकडून होणार नाही यासाठी प्रयत्न करू शकतो.

१०) तलाव, समुद्र, विहिरी, नद्या, खाडी अशा जलाशयांमध्ये कोणताही कचरा (निर्माल्यासह) टाकण्याचे टाळू शकतो.

११) छंद म्हणून पशू पक्ष्यांना पिंजऱ्यात बंदिस्त करून त्यांना पाळणे टाळू शकतो.

संकलन व प्रसार : **प्रा. मोहन पाठक**

# परिसर वार्ता - सप्टेंबर २०००

**विशाखा देशपांडे**

गेल्या काही दिवसांत परिसरात फारसे उपक्रम पार पडले नसले तरी, सर्व जण मोठ्या उत्साहाने दैनंदिन कार्यक्रम व आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडीत आहेत. विद्या प्रसारक मंडळाच्या महत्त्वपूर्ण घडामोडींचा गौरव म्हणून जे कार्यक्रम पार पडले त्याचा आढावा इथे घेत आहे.

दरवर्षी प्रमाणे वाजत - गाजत आणि उत्साहात गणरायाचे आगमन झाले आहे आणि आशा आहे की त्याच्या आर्शीवादाने इतरही सर्व गोष्टी निर्विघ्नपणे पार पडतील. त्या विघ्नहर्त्याला वंदन करून ही परिसर वार्ता सादर करीत आहे.

**विद्या प्रसारक मंडळ - दि. ६ ऑगस्ट २०००**

ठाणे शहराच्या शैक्षणिक वाटचालीत विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या संस्थेचे मोलाचे योगदान आहे. ६५ वर्षांपूर्वी स्थापना झालेल्या या धाडसी व जिद्दी शैक्षणिक संस्थेचा सुरुवातीपासूनचा इतिहास संस्थेचे विद्यमान कार्याध्यक्ष श्री. अचलकुमार टिल्लू यांनी शब्दबद्ध करून 'तयाचा वेलु, गेला गगनावरी' या पुस्तक रूपाने प्रसिद्ध केला आहे व त्यायोगे नव्या धडपडणाऱ्या संस्थांसाठी मार्गदर्शनाचा खजिनाच ठेवला आहे. रविवार दि. ६ ऑगस्ट रोजी या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन सोहळा, विद्या प्रसारक मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात थाटामाटात संपन्न झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध जेष्ठ साहित्यिक, इतिहास समीक्षक व ७३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. य.दि. फडके उपस्थित होते. त्यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा पार पडला. या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन १९९६ साली झाले होते. अवघ्या ४ वर्षांतच दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्यात विद्या प्रसारक मंडळाला अभिमान वाटतो. या इतिहासाच्या १ल्या आवृत्तीला श्री. टिल्लू यांना मोलाचं सहकार्य लाभलं ते प्रा.मोहन पाठक व श्री. दिलीप जोशी यांचे.



या प्रसंगी आपले विचार मांडताना, श्री. य.दि. फडके यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी व आर्यन एज्युकेशन सोसायटी यांच्या इतिहासाची रंजक उदाहरणे देऊन, संस्थेचा इतिहास पुस्तक रूपात असणे कसे अत्यावश्यक आहे हे पटवून दिले. बहरलेला वटवृक्ष पहाताना व त्याच्या छायेचा गारवा अनुभवताना नव्या पिढीला या वटवृक्षाची, रोपट्या पासून जोपासना कशी व कोणी केली याची माहिति असणे जरुरीचे आहे. असं त्यांनी नमूद केलं.

लेखक या नात्याने श्री. अचलकुमार टिल्लू यांनी सांगितले,'' ही संस्था उत्तरोत्तर कशी फुलत गेली, त्या मागचे कष्ट व मेहनत कोणाची हे सर्व लोकांपुढे ठेवणे ही एक नैतिक बांधिलकी आहे असे समजून या इतिहास लेखनाचा विडा मी उचलला.''

या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. ना. बेडेकर यांनी समयोचित भाषण केले. मात्र, या प्रसंगी य.दि. फडक्यांसारखे व्यक्तिमत्त्व समारंभास हजर असूनही, श्रोतृवर्ग अत्यंत अल्प संख्येने उपस्थित असल्याची खंत व्यक्त करून,

आम्हीच या ठिकाणी कुठे तरी कमी पडलो असे मत व्यक्त केले. या समारंभाला ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष श्री. पां. के. दातार, यांचे सहकार्य लाभले.

**विद्या प्रसारक मंडळ : ९ ऑगस्ट २०००**

शालांत परीक्षेत मुंबई विभागातून प्रथम आलेला नचिकेत सुरेश थोरात आणि तृतीय वर्ष बी.एस्.सी. ला मुंबई विद्यापीठातून प्रथम आलेली प्राजक्ता सारंग यांचा सत्कार दि. ९ ऑगस्ट रोजी करण्यात आला. या सत्कार समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात सौ. वीणा जोशी यांच्या स्वागत गीताने झाली. या प्रसंगी बोलताना मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. अ.पो. टिल्लू म्हणाले की या पूर्वी, संस्थेच्या इतिहासात, बोर्डाच्या व विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येणारे अनेक विद्यार्थी आहेत. अनेकांनी या पूर्वी एखाद्या विषयामध्ये प्राविण्य प्राप्त करून गुणवत्ता यादीत यश संपादन केले पण अगदी प्रथम क्रमांकाचे घवघवीत यश नचिकेत व प्राजक्ता यांनी प्रथमच संपादन केले व त्यामुळे विद्या प्रसारक मंडळ, सौ. आनंदीबाई जोशी स्कूल व बांदोडकर महाविद्यालयाचे नाव व लौकिक अधिक उंच करून दिले. मंडळामध्ये जसे हुशार विद्यार्थी आहेत तसेच हुशार शिक्षक व प्राध्यापकही आहेत हे नमूद करताना त्यांनी मुंबई विद्यापीठात एम.लिब (M.L.I.S.c.)च्या परीक्षेत प्रथम आलेल्या, बांदोडकर कॉलेजच्या प्रा. मोहन पाठक यांचाही उल्लेख केला.

या नंतर प्रा. उषा लांबे यांनी प्रमुख पाहुणे डॉ. मुणगेकर यांची ओळख करून दिली. त्यानंतर मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. या नंतर सौ. आनंदीबाई जोशी स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांचे भाषण झाले. चि. नचिकेतचा आज सत्कार म्हणजे मला अतिशय आनंदाचा क्षण आहे असं त्या म्हणाल्या. या वेळी त्यांनी शाळेच्या माजी सुपरिटेंडेंट दिवंगत सौ. रोशन पटेल यांची प्रकर्षाने आठवण काढली. शाळेमधे या पूर्वी ४थी व ७वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत आल्याचं, दिल्ली बोर्डाच्या सामान्यज्ञानाच्या व इतर परीक्षांच्या नंबरात आल्याचं नमूद केलं, परंतु हे एवढं उत्तुंग यश पदरात घेताना खूपच अभिमान वाटतो असं त्या म्हणाल्या. या वेळी त्यांना त्यांचे गुरु स. वि. कुलकर्णी व डॉ. बेडेकर यांचे अभिनंदना बद्दल आभार मानले.

या नंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नचिकेतचा भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. मंडळाचे कंत्राटदार श्री. ठक्कर यांनीही या वेळी रु. ५,०००/- देऊन नचिकेतचा सत्कार केला.

नचिकेत याने सत्काराला उत्तर देताना सांगितले की, "१ ली ते ७ वी पर्यंत माझ्या आईने माझा अभ्यास घेतला. आईची शिकवण्याची पद्धत अतिशय उत्तम होती. ७वी नंतर मला वडिलांनी शिकवले. नचिकेतने आपल्या या यशाचे श्रेय पूर्णपणे आपल्या आई-वडिलांना व शाळेला दिले. या नंतर बांदोडकर कॉलेजचे प्राचार्य सौ.डॉ. पाटील यांनी आपल्या भाषणात, 'सामाजिक बांधिलकीची जाण असलेले व्यक्तिमत्व' अशा शब्दांत डॉ. मुणगेकर यांचा गौरव केला. ते म्हणाले की, आज फक्त प्राजक्ता सारंगचा

सत्कार नसून, गुणवत्तेचा सत्कार आहे, आणि ही गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून कसून तयारी करुन घेणाऱ्या प्राध्यापकांचा सत्कार आहे. प्राजक्ताला प्रोत्साहन देऊन, मार्गदर्शन करणारे तिचे वडिल व आपल्या कॉलेजचे प्राध्यापक सारंग सर, यांचा हा सत्कार आहे. या पूर्वी कॉलेजातून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आलेल्या व आपापल्या क्षेत्रात उजळत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा उल्लेख केला.

प्राजक्ता सारंग हिने आपल्या भाषणात सांगितले की, आपल्या ध्येयप्राप्ती साठी कठोर परिश्रम केले. तिनेही आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांना दिले. नोकरी आणि संसार अशी कसरत संभाळत योग्य मार्गदर्शन करीत आईने दिलेल्या प्रोत्साहनाचा तिने विशेष उल्लेख केला. शेवटी, आपण पाच वर्ष ज्या महाविद्यालयात शिक्षण घेतले त्याचे व संस्थेचे नाव-उज्वल करण्यात यशस्वी झालो या बद्दल समाधान व्यक्त केलं.

या नंतर प्रमुख पाहुणे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की "मी कुलगुरु म्हणून या दोन गुणवान विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत नसून व्यक्तिशः भालचंद्र मुणगेकर म्हणून त्यांचं अभिनंदन करीत आहे. विद्यापीठ हे लोकाभिमुख विद्यापीठ असावे. जिथे विद्यार्थी-प्राध्यापकामध्ये चांगल्या प्रकारचा संवाद असायला हवा, अशी माझी संकल्पना आहे. स्त्रियांच्या प्रति मी Bias आहे आणि त्याचं कारण हे आहे की तीन हजार वर्षांच्या इतिहासापासून स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात मुक्त होण्याचा प्रयत्न करते आहे. प्राजक्ता सुद्धा याच स्त्री समाजाची प्रतिनिधी आहे. म्हणून तिचे विशेष कौतुक करण्यासारखं आहे. ज्ञान प्राप्त करण्यासाठी एक प्रकारची जिज्ञासा असावी लागते आणि प्राजक्ता आणि नचिकेत त्याच मार्गावर आहेत. या दोघांच्या सत्कारामध्ये मी माझं पूर्वायुष्य पहात होतो. मी आज आवर्जून येण्याचे दुसरे कारण म्हणजे डॉ. वा. ना. बेडेकर यांना मनापासून अभिवादन करण्यासाठी. त्यांचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा आहे हे शिकण्याजोगं आहे. ते खरोखर प्रयोग करणारे ऋषी आहेत. मी त्यांना जाहिरपणे खऱ्या अर्थाने शिक्षण महर्षी समजतो. मी कुलगुरु झाल्यामुळे 'भारताचा नागरिक' या माझ्या पदामध्ये बदल झालेला नाही. आणि माझे हे पद सर्व पदां पेक्षा जास्त महत्वाचे आहे. ज्या विद्यापीठाला बांदोडकर सारखे कॉलेज संलग्न आहे, त्या विद्यापीठाचा कुलगुरू होण्याचा मला अभिमान आहे. हल्लीच्या दिवसांमधे बहुत करुन कॉलेजमध्ये निराशामय वातावरण असतं. परंतु या कॉलेजमधील वातावरण चैतन्यमय आहे. या ठिकाणी आल्यानंतर संगीताच्या साथीत स्वागत झाल्यावर व बऱ्याच दिवसांनी मराठी भाषा कानावर पडल्यामुळे खूप बरं वाटलं. कारण 'Marathi language is an integral part of your innerself.'

आपले भाषण संपवताना डॉ. मुणगेकर म्हणाले की, 'समाज ही एक फार मोठी प्रयोगशाळा आहे. मी Economics, PHD मधून शिकलो नाही तर खऱ्या अर्थाने समाजाकडून शिकलो.'

डॉ. वा. ना. बेडेकरांनी, नचिकेतचे कौतुक करताना, पुराणातील नचिकेताची गोष्ट सांगून, त्या नचिकेता प्रमाणे, आमच्या नचिकेतने पण अभ्यासाचा ध्यास घेतला होता, असे सांगितले. प्राजक्ताने, प्राजक्ताच्या फुलांचा सडा पाडून त्याचा सुगंध सर्वत्र दरवळवलाय.

कार्यक्रमाच्या शेवटी मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर यांनी सर्व उपस्थितांचे व सहकार्यांचे आभार मानले.

**बांदोडकर महाविद्यालय - 'कचरा निर्मूलन मोहीम'**

२२ ऑगस्ट २००० रोजी ठाणे महापालिका, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजना आणि पर्यावरण दक्षता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने, 'कचरा

निर्मूलन मोहीम' या विषयावर, थोरले बाजीराव पेशवे सभागृहात कार्यक्रम संपन्न झाला. सुका आणि ओला कचरा असे वर्गीकरण करून त्याची विल्हेवाट आपापल्या सोसायटीच्या वा घराच्या आवारात लावणारी कचरा निर्मूलनाची मोहीम आता ठाण्यात सुरु होणार आहे. या कार्यक्रमाच्या वेळी अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. एस्. व्ही. करंदीकर होते. प्राचार्य सी.जी. पाटील, मराठी विज्ञान परिषदेचे डॉ. भानुशाली, पर्यावरण दक्षता मंचाचे डॉ. नंदकुमार जोशी आणि इतर मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. या संबंधी घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गाचे उद्‌घाटन ठाणे महापालिका आयुक्त के.पी. बक्षी यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्रचे सुमारे ३०० विद्यार्थी या प्रशिक्षण वर्गात सहभागी झाले असून त्यांना कचऱ्यांचे वर्गीकरण करून त्याची विल्हेवाट लावण्याच्या विषयात प्रशिक्षित केले जाणार आहे. या प्रसंगी बोलताना आयुक्त के.पी. बक्षी यांनी, जागरूक नागरिक आणि संस्था यांनी या मोहीमेस सहकार्य करावे असे आवाहन केले. ३०० प्रशिक्षणार्थी घरोघरी जाऊन लोकांना त्याबद्दल समजावून माहिती देणार आहेत.

ठाण्याचे आरोग्याधिकारी डॉ. बी. एस. वावसकर, मुंबई महापालिकेचे विशेष कार्य अधिकारी आनंद जगताप, भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटरचे माजी अधिकारी डॉ. ए.एम. भागवत, पर्यावरण दक्षता मंचचे डॉ. नंदकिशोर जोशी, प्रसिद्ध अभिनेत्री सुहास जोशी, डॉ. एन.डी. मांडगे यांनी प्रशिक्षण वर्गात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## जोशी - बेडेकर-कला-वाणिज्य महाविद्यालय

तृतीय वर्ष बी.ए. चा निकालाची टक्केवारी

एकूण - ३०३ प्रथम श्रेणी - ४४ द्वितीय श्रेणी - १९० उत्तीर्ण श्रेणी - ५४ अनुत्तीर्ण - १५

कॉलेजचा निकाल ९५.०४% विद्यापीठाचा निकाल - ८५.०४%

| विषय | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | उत्तीर्ण श्रेणी | अनुत्तीर्ण श्रेणी | एकूण | निकाल | उच्चांकावर सीट क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी | १ | १० | २ | १ | १४ | ९२.७५% | ३७०/६१२० |
| मराठी | १ | १३ | ३ | - | १७ | १००% | ३६४/६१७९ |
| हिंदी | ३ | ६ | - | - | ९ | १००% | ४१०/६१९३ |
| अर्थशास्त्र | ६ | ५३ | ३० | ८ | ९७ | ९१.७५% | ३९६/६३२५ |
| इतिहास | ५ | ४४ | ८ | ३ | ६० | ९५ % | ३९२/६५९५ |
| पॉलिटिक्स | ७ | २५ | ७ | २ | ४१ | ९५.१२% | ४१७/६७४४ |
| तत्वज्ञान | ७ | ७ | - | - | १४ | १००% | ४२८/६७५२ |
| भूगोल | १४ | ३२ | ४ | १ | ५१ | ९८.०३% | ४०५/६८०५ |

झाड तोडणं सोप लावणं कठीण

प्रथम क्रमांक - मालगुंडकर गौरी अशोक ७७.३३%
द्वितीय क्रमांक - वोरा टीना प्रवीण ६९.५०%
द्वितीय क्रमांक - शेख निलूफर मोहम्मद ६९.५०%
तृतीय क्रमांक - जठार संगीता कमलाकर ६८.३३%

**फेब्रुवारी २००० च्या बारावीच्या परीक्षेचा निकाल :-**

**१२वी कला**

१) सिंग शालिनी ब्रिजनारायण ४७१
२) जाधव अमोल रमेश ४३४
३) गर्जुर सीमा सुहास ४२८

**१२वी वाणिज्य**

१) अभंग ज्योती अशोक ४९७
२) बरवानीवाला बतुल झाकीर ४९१
३) बागडे वैशाली गणपत ४६७

एकूण निकाल :

कला - ८६.२५%
वाणिज्य - ९२.०२%

**तंत्रनिकेतन**

विद्या प्रसारक मंडळाच्या विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठीच्या व्याख्यात्या प्रा. उषा बाळ यांनी याच संस्थेच्या तंत्रनिकेतनातील एक होतकरू विद्यार्थी कु. महेश कोलते (T.Y.E.P.S.) याला फी च्या स्वरूपात रु. ५०००/- ही रक्कम दिली आहे. शिवाय सौ. कुंदा गोखले यांच्या मार्फतही त्यांनी त्या विद्यार्थ्याला रु. १०,०००/- मिळवून दिले आहेत. एकंदर त्या विद्यार्थ्याला रु. १५,०००/- ची मदत मिळालेली आहे. ज्यांची शिकायची इच्छा आहे पण परिस्थितीमुळे शिकणे राहून जाऊ नये यासाठी त्यांनी हा मदतीचा हात पुढे केला आहे. त्यासाठी तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सौ.श्री. मुजुमदार यांनी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत. हा विद्यार्थी त्यांची मदत विसरणार नाही. सौ. उषा बाळ व सौ. कुंदा गोखले या माजी कार्याध्यक्ष कै. रा.कृ. गोखले यांच्या अनुक्रमे कन्या व स्नुषा आहेत.

आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे पण शिकायची जिद्द आहे अशा विद्यार्थ्यांना तंत्रनिकेतनातील शिक्षकवर्गानेही एकत्र येऊन मदतीचा हात पुढे करायचे ठरविले आहे व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्नही चालू आहेत.

जेव्हा हे विद्यार्थी पुढे चांगले कर्तबगार होतात व तंत्रनिकेतनाला भेट देतात तेव्हा त्यांचा तंत्रनिकेतनाला अभिमान वाटतो.

**सौ. आनंदीबाई केशव जोशी - इं.मि. स्कूल-**

**पूर्व प्राथमिक**

दि. १४ ऑगस्ट रोजी शाळेमधे रक्षाबंधन साजरे करण्यात आले. शिशु वर्गाच्या सर्व मुलींनी घरून राख्या आणल्या होत्या व सर्व मुलांनी बहिणींसाठी चॉकलेटस् आणली होती. सर्व मुलींनी वर्गातील मुलांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले.

दि. २२ ऑगस्ट रोजी 'दही हंडी' साजरी करण्यात आली. छोटा व मोठा शिशु यांच्या वेगवेगळ्या हंड्या बांधल्या होत्या. सुरुवातीला मुलांनी 'गोविंदा आला रे आला' च्या तालावर नाचून मग पारंपारिक पद्धतीने हंड्या फोडण्यात आल्या.

या कार्यक्रमासाठी छोटा शिशु मधील मिहिर आपटे व मोठा शिशुमधील विदित डाकी हे श्रीकृष्ण होऊन आले होते.

हंड्या फोडल्यावर सर्वांना दहीकाल्याचा प्रसाद देण्यात आला.

•••

# दिशा वर्ष ४ थे लेख सूची

*दिशा वर्ष : ४ या वर्षातील लेखांची सूची येथे देत आहोत. जुलै ऑगस्टच्या अंकात जागे अभावी ही सूची देता आली नव्हती. अभ्यासकांची सोय व्हावी हा या सूची मागील हेतू आहे. - संपादक*



| क्र. | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | अनु.क्र. व महिना | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | अवकाश विज्ञानातील मूलभूत विचारांचे प्रणेते | अनिल शाळीग्राम | ३/सप्टें. ९९ | १९-२१ |
| २. | असं व्हायला नको होतं! | गिताली इंगवले | २/ऑगस्ट ९९ | २६-२८ |
| ३. | आदरणीय प्राध्यापकहो... | अजित जोशी | १/जुलै ९९ | २१-२२ |
| ४. | आठवणींचे पक्षी : बालपणाच्या दाहक आठवणी | मानसी | ९/मार्च २००० | २६-२७ |
| ५. | आनंदयात्री पणशीकर | शब्दांकनः संजय बोरकर | ५-६/नोव्हे.डिसें.९९ | २२-२४ |
| ६. | आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिंपियाडमध्ये भारताची यशस्वी वाटचाल | विशाखा देशपांडे | ३/सप्टें. ९९ | ३०-३२ |
| ७. | इयत्ता पहिलीपासून इंग्रजी | अचलकुमार टिल्लू | ४/९ मार्च २००० | मुखपृष्ठ १-२ |
| ८. | उद्योजकतेचे बालामृत | प्रवीण प्रधान | १/जुलै ९९ | ६-९ |
| ९. | "एक आगळं वेगळं विप्लेषणतंत्र | सुषमा पौडवाल | ९/मार्च २००० | १४-१५ |
| १०. | एड्सच्या विळख्यात : एक वाचनीय पुस्तक | मोहन पाठक | १/जुलै ९९ | २३-२४ |
| ११. | कविकुलगुरु कालिदास आणि प्रेम | अरविंद दोडे | २/ऑगस्ट ९९ | २५-२७ |
| १२. | कादंबरीकार खांडेकर | मंजिरी दांडेकर | ७/जाने. २००० | ३-१२ |
| १३. | कारगिलमधील महाभारत आणि जागतिक राजकारणाचे बदलते संदर्भ | प्रशांत देशपांडे | २/ऑगस्ट ०० | १०-१४ |
| १४. | कुमार कला केंद्र | मनोज गडनीस | ७/जाने. २००० | ३३-३६ |
| १५. | कोचिंग क्लासेस-एक आत्मपरीक्षण | मंजुषा दांडेकर | १०/एप्रिल २००० | १४-१५ |
| १६. | 'गनिमी कावा' या युद्धशास्त्राचे अनमोल उदाहरण 'प्रताप गड युद्ध' | अरुण ठाकूर | १/जुलै ९९ | ३-५ |
| १७. | ग्राहक चळवळ व ग्राहक कायदा | आशा अ. दातार | ८/फेब्रु. ९९ | २२-२३ |
| १८. | जादूगिरी | अरुण ठाकूर | ३/सप्टे. ९९ | २२-२६ |
| १९. | चुकते कुठे ? | सविता केळकर | ४/ऑक्टो. ९९ | ३०-३१ |
| २०. | छंद माझा आगळा | अशोक मुळ्ये | २/ऑगस्ट ९९ | ३१-३२ |
| २१. | छोट्यांच्या राज्यात | प्रतिनिधी | ९/मार्च २००० | २५-२५ |
| २२. | दत्तसंप्रदाय आणि उपासनामार्गाचे ध्येय | ज्योती जोशी | ७/जाने. २००० | २९-३२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | दिवाळी आली हसत नाचत खेळत आली | अचलकुमार टिळू | ५-६/नोव्हेंबर ९९ | ३ |
| २४. | दिशाची वाटचाल | | | |
| २५. | दिशा वर्ष १ले लेख सूची | मंजिरी दांडेकर | १/जुलै ९९ | ३५-३८ |
| २६. | दृष्टिकोन | अरुणा तिवारे | २/ऑगस्ट ९९ | ३-५ |
| २७. | नियतकालिकातील साहित्य-एक चिंतन | रवींद्र मांजरेकर | २/ऑगस्ट ९९ | १८-२० |
| २८. | नवीन इ. सनाचे स्वागत | अचलकुमार टिळू | ४-७/जाने. २००० | मुखपृष्ठ १-२ |
| २९. | निसर्गाचे भीषण तांडव-किल्लारी | प्रदीप केळकर | ५-६/नोव्हें-डिसें ९९ | २५-२९ |
| ३०. | नेटवर्क वापरा, तात्काळ माहिती मिळवा ! | प्रवीण वि. प्रधान | ४/ऑक्टो. ९९ | १८-२३ |
| ३१. | 'न्यायमंदिरात लोकमान्य टिळक' टिळक विचाराकडे पहाण्याचा वेगळा दृष्टिकोन | मोहन पाठक | २ऑगस्ट ९९ | ३३-३४ |
| ३२. | पदवी आणि रोजगारांची उपलब्धता एक कटु सत्य आणि त्यावरील उपाय | प्रा. भा. ना. लाड | २/ऑगस्ट ९९ | ६-९ |
| ३३. | पर्यावरण तुमच्या माझ्यासाठी | अरुण जोशी | ३/सप्टें. ९९ | ७-११ |
| ३४. | पर्यावरण तुमच्या माझ्यासाठी-२ | अरुण जोशी | ४/ऑक्टो. ९९ | १०-१२ |
| ३५. | परिसर वार्ता | मोहन पाठक | २/ऑगस्ट९९ | ३८-४० |
| ३६. | परिसर वार्ता | विशाखा देशपांडे | ४/ऑक्टो.९९ | ३२-४० |
| ३७. | परिसर वार्ता | विशाखा देशपांडे | ७/जाने.२००० | ३७-४० |
| ३८. | परिसर वार्ता | विशाखा देशपांडे | ८/फेब्रु.२००० | २६-४० |
| ३९. | परिसर वार्ता | विशाखा देशपांडे | ९/मार्च २००० | २९-४० |
| ४०. | परिसर वार्ता | विशाखा देशपांडे | १०/एप्रिल २००० | ३३-४० |
| ४१. | परीक्षा पद्धतीला अवास्तव महत्त्व दिले जात असल्याने शिक्षणाची मूळ उद्दीष्टे साध्य होत नाही. | प्र. ग. वैद्य | १/जुलै ९९ | २८-३० |
| ४२. | प्रकल्प (Projects) या विषयी ग्रंथालयाच्या अपेक्षा | प्रदीप कर्णिक | ५-६/नोव्हें-डिसें. ९९ | १३-१६ |
| ४३. | प्रचलित शिक्षण -किती कालबाह्य किती कालोचित ? | मंजिरी वा. दांडेकर | १/जुलै ९० | १२-१४ |
| ४४. | प्रजासत्ताकाची पन्नाशी | अचलकुमार टिळू | ४/८ जाने. २००० | मुखपृष्ठ १,२ |
| ४५. | प्राथमिक शिक्षण | अचलकुमार टिळू | २/४ ऑगस्ट ९९ | मुखपृष्ठ १,२ व पान ९ |
| ४६. | वातचीत : बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी | दिपाली भाटकर अरुण ठाकूर | ९/मार्च २०००० | २०-२२ |
| ४७. | बौद्ध लेण्याची देन्यावस्था | मनोज गडनीस | ५-६/नोव्हें-डिसें. ९९ | ३३-३३ |
| ४८. | ब्रह्मविद्या-आध्यात्मिक स्वसंशोधन व ध्यानाचे दुर्मिळ योगशास्त्र | | ५-६/नोव्हें-डिसें. ९९ | ३७ |


बेघरांना घर देणारांनो, पक्ष्यांचे घर हिरावू नका.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४९. | भांडण | सुगंधा चव्हाण | ४/ऑक्टो. ९९ | २७-२८ |
| ५०. | मंत्रमुग्ध करणारी कसरत-जिम्नॅस्टिक्स | मंजिरी दांडेकर | ८/फेब्रु. ९९ | ८-१३ |
| ५१. | मन | अचला महाजन | ४/ऑक्टो. ९९ | २४-२६ |
| ५२. | मनोगत-एक गिर्यारोहकाचे | प्रदीप स. केळकर | २/ऑगस्ट ९९ | ३३-३४ |
| ५३. | मराठी भाषा संकल्प प्रतिज्ञा | अ.बि. सहस्त्रबुद्धे | १/जुलै ९९ | २५-२७ |
| ५४. | महाराष्ट्राचा इतिहास | | ९/मार्च २००० | २८ |
| ५५. | माध्यमिक शाळा | अचलकुमार टिळू | ४/३ सप्टें ९९ | मुखपृष्ठ १-२ |
| ५६. | माणसातला 'कवी' वेपना... | शिल्पा ल. पाटील | ९ /मार्च २००० | १४-१५ |
| ५७. | माहितीचे तंत्रज्ञान आणि शिक्षण | अनिल शाळीग्राम<br>प्रशांत देशपांडे | ७/जाने. २००० | १८-२२ |
| ५८. | मी पाहिलेली इटली (पूर्वार्ध २) | ग. त्रि. दाभाडे | ८/फेब्रु. ९९ | १८-२१ |
| ५९. | मुंबई ते इटाली-एक विज्ञान प्रवास | विशाखा देशपांडे | ८/फेब्रु. ९९ | ३-७ |
| ६०. | मेघदूत-एक रसास्वाद | सौ.सुनिता खरे | ७/जाने. २००० | २५-२८ |
| ६१. | योग्य कामाचा योग्य गौरव | दिपाली भाटकर | ९/मार्च २००० | २३-२४ |
| ६२. | राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीतून माझा देश | सुहास साठे | १०/एप्रिल २००० | १९-२२ |
| ६३. | 'रिंकु पाटील, अमृता देशपांडे, नीता हेंद्रे'<br>आपण कोठे चुकतो ? | पद्मा सुर्वे-भाटकर | ९/मार्च २००० | १६-१७ |
| ६४. | लोकमान्य टिळक आणि शिक्षण क्षेत्र | श्रीनिवास वेळवी | ५-६/नोव्हें-डिसें.९९ | ८-१२ |
| ६५. | लोकशाहीची प्रतिष्ठा आणि लोकप्रतिनिधी | रविंद्र मांजरेकर | ३/सप्टें. ९९ | २७-२९ |
| ६६. | वटपौर्णिमा-एक नवी संकल्पना | माधुरी पेजावर | २/ऑगस्ट ९९ | १५-१७ |
| ६७. | 'वानप्रस्थ-परार्थाकडून-परमार्थाकडे' | मंजिरी धर्माधिकारी | ५-६/नोव्हे,डिसें.९९ | ३४-३६ |
| ६८. | विनाशाच्या उंबरठ्यावर भारतीय वाघ | संतोष शिंत्रे | ५-६/नोव्हे,डिसें.९९ | ३०-३२ |
| ६९. | विसाव्या शतकातील शैक्षणिक वाटचाल (लेखांक २) | अ.धों. टिळू | ९/मार्च २००० | ६-१० |
| ७०. | वृद्धाश्रम हा उपाय योग्य की अयोग्य | अ.बि. सहस्त्रबुद्धे | १०/एप्रिल २००० | ३-७ |
| ७१. | वृत्तपत्रक्षेत्रातील स्थित्यंतरे | चंद्रशेखर वाघ | ५-६/नोव्हे,डिसें.९९ | ५-७ |
| ७२. | विकृतीकडे झुकलेली जाहिरात | व्ही. सित्रसकर | ४/ऑक्टो. ९९ | ३-९ |
| ७३. | विख्यात तबलावादक -भाई गायतोंडे यांच्याशी<br>झालेल्या गप्पा. | मनाली देवधर | ७/जाने. २००० | १३-१७ |
| ७४. | वि.प्र. मंडळाच्या बोधचिन्हाची कथा | व्ही. सित्रसकर | १/जुलै ९९ | १०-११ |
| ७५. | व्यक्तिमत्व विकासाची प्रक्रिया | अशोक जोशी | ८/फेब्रु. ९९ | २४-२५ |
| ७६. | शतकातले अखेरचे शैक्षणिक वर्ष | मोहन पाठक | १/जुलै ९९ | ३१-३४ |
| ७७. | शांताराम राऊतांचे वेगळेपण | मंजिरी दांडेकर | ४/ऑक्टो. ९९ | १३-१७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७८. | शासकीय अनुदाने आणि पुरस्कार | रविंद्र मांजरेकर | ८/फेब्रु. ९९ | १४-१७ |
| ७९. | शाळा प्रवेश | अचलकुमार टिळू | १/जुलै ९९ | मुखपृष्ठ १ व ३ |
| ८०. | शिक्षण व अध्यात्म | अ.वि. सहस्रबुद्धे | ३/सप्टें. ९९ | १२-१३ |
| ८१. | शिक्षणाचे माध्यम : इंग्रजी की मराठी ? | मंजिरी दांडेकर | २/ऑगस्ट ९९ | २१-२४ |
| ८२. | संगणक पदव्युत्तर अभ्यासक्रमातील आकलन आणि परावर्तन एक घटक | रावसाहेब बोरसे | १०/एप्रिल २००० | १६-१८ |
| ८३. | सरत्या सहस्रकातील सर्वांत महान व्यक्ती | रविंद्र मांजरेकर | १०/एप्रिल | १०-१३ |
| ८४. | सारांपाट | राजेश राणे | १०एप्रिल | २३-३२ |
| ८५. | सहनसिद्धी | अरविंद दोडे | १/जुलै ९९ | १८-२० |
| ८६. | सीमोल्लंघन | अचलकुमार टिळू | १०/एप्रिल २००० | मुखपृष्ठ १व२ |
| ८७. | सूर्यग्रहण | मनोहर न्यायते | ४/४ ऑक्टो. ९९ | १४-१८ |
| ८८. | सोळा वर्षांचा अवसर गेल्यानंतर समजलेले प्रधान सर | प्रदीप कर्णिक | ३/सप्टें. ९९ | ३-६ |
| ८९. | सोव्हिएट रशियाचा साक्षेपी इतिहास | मोहन पाठक | ४/ऑक्टो. ९९ | २९-२९ |
| ९०. | सौरभ चौबे-आमचा अभिमान विषय | शीतल हळदणकर अल्पना गुप्ते, मानसी वापट, प्रिया मराठे | अंक७/जाने. २००० | २३-२४. |
| ९१. | स्पर्धा | संजत गुमास्ते | २/ऑगस्ट २००० | २९-३० |
| ९२. | 'हे कुणी सुनाला सांगावे ?'' | श्रीराम कृ. बोरकर | १०/एप्रिल २००० | १०-१३ |
| ९३. | 'व्हिजन २०००' | दीपाली सुरते | ९/मार्च २००० | १८-१९ |


सूची संकलन : प्रा. मोहन पाठक
विशेष सहाय्य : मनीषा सालेकर